# तिसरे प्रकरण

## भाऊसाहेबांची बखर - एक वाङ्मयीन आकलन

## तिसरे प्रकरण

# कृष्णाजी शामराव विरचित भाऊसाहेबांची बखर : एक वाङ्मयीन आकलन

पानिपतच्या प्रसंगावर पेशवे कालात अनेक बखरी लिहिल्या गेल्या. त्यात प्रामुख्याने पानिपतची बखर, होळकरांची कैफियत, होळकरांची थैली, भाऊसाहेबांची बखर, भाऊसाहेबांची कैफियत ह्या बखरी आहेत. पानिपतच्या युध्दापूर्वी मराठेशाहीने जे वैभव भोगले होते ते पानिपतच्या युध्दाने उध्वस्त झाले. मराठ्यांनी केलेल्या मुलुखगिऱ्या, त्यानी वसुल केलेल्या खंडण्या, त्यांचा दरारा आणि वचक तसेच त्यानी उत्तर हिंदुस्तानात केलेल्या राजकीय उलाढाली आणि दिल्लीच्या गादीवर प्रस्थापित केलेले वर्चस्व हे सर्व लयाला गले. केवळ नानासाहेबच नव्हे तर सामान्य मराठी माणूसही हाय भाऊ ! हाय भाऊ! म्हणून दु:ख करू लागला. या पानिपतच्या युध्दात अपयश आल्याने मराठ्यांचे साम्राज्य नष्ट झाले. मराठ्यांना या युध्दात विजय मिळवता आला असता तर महाराष्ट्राचाच काय पण संपूर्ण भारत देशाचा इतिहास बदलला असता. पण या जर तरच्या गोष्टी ! स्वीकारले पाहिजे ते वास्तवच !

पानिपत या ऐतिहासिकदृष्ट्या महत्वाच्या युध्दप्रसंगाची माहिती देणारी भाऊसाहेबांची बखर ही कृष्णाजी शामराव यांनी इ.स. १७६१ मध्ये लिहिली. या बखरीचे दोन भाग पडतात. एक कुंभेरी प्रकरणी शिंदे होळकरांचा बेबनाव झाल्यापासून ते दत्ताजी शिंद्यांच्या वीर मरणापर्यंत आणि दुसरा भाग शिंदे-होळकरांच्या इच्छेविरूध्द अबदालीचा पाडाव करण्यासाठी भाऊसाहेब उत्तर हिंदुस्तानात उतरल्यापासून ते अखेरच्या पानिपतच्या युध्दात मराठ्यांचा संपूर्ण सर्वनाश होईपर्यंत.

## कथावस्तु

१.लेखनास आज्ञा-राजश्रीया विराजीत राजमान्य राजश्री व्यंकाप्पा नाईक दिंडोरे यांच्या आज्ञेवरून "हिंदुस्तानातील आद्यंत वर्तमान प्यादाचा फर्जी नजीबखान रोहिला होऊन दक्षिण देशी हिंदुपद श्री राजा शाहु छत्रपती यांचा मुख्य प्रधान आदि करून सवा लक्ष फौजेनिशी भाऊगर्दी होऊन प्यादेमात कैशी जाली" [१] ह्या विषयी सविस्तर माहिती कृष्णाजी शामराव यांनी लिहिली.

२.गृहकलह-श्री राजा शाहु छत्रपती यांनी निधनासमयी राजश्री बाळाजी पंडित प्रधान यांना बोलावून सांगितले की, यापुढे आपण राज्य चालवावे म्हणून सर्व सत्ता त्यांच्या हाती दिली. हिंदुस्तानच्या मोहिमेसाठी राजश्री रघुनाथराव दादासाहेब, मल्हारराव होळकर, जयाप्पा शिंदे, विठ्ठल शिवदेव, अंताजी माणकेश्वर, गोविंदपंत बुंदेले, यशवंतराव पवार यांच्या सारखे मोठमोठे सरदार तसेच लहान थोर सैनिक असे पाऊणलाख फौज घेवून निघाले. नर्मदा पार करून मालवे, सोंदेवाडा, खेचीवाडा, बुंदीकोट, राजगड, पाटण, जैनगर, ग्वालेरी, झांसी व कालपी अशा खंडण्या घेत ते सुरजमल जाटांच्या मुलखापर्यंत गेले. रघुनाथरावदादांनी जाटांच्याकडे एक कोटी रू. खंडणी मागितली. जाटाने चाळीस लक्ष रूपये देण्याचे कबुल केले. यावरून संघर्षाला प्रारंभ झाला. दादासाहेबांनी कुंभेरीच्या किल्ल्याला वेढा दिला. या युध्दात एकेदिवशी अचानक मल्हाररावांचा एकुलता एक पुत्र खंडेराव याला गोळी लागून तो मरण पावला.

३.मल्हाररावांची सूडाची प्रतिज्ञा-ही बातमी मल्हाररावांना मिळताच ते रागाने बेभान झाले. त्यांनी जाटांचा सूड घेण्याची प्रतिज्ञा केली. "सुरजमल जाट यांचा सिरच्छेद करीन व कुंभेरीची माती यमुनेत टाकीन तरीच जन्मास आल्याचे सार्थक, नाहीतर प्राणत्याग करीन." [२] मल्हारराव जे बोलून दाखवितात ते करतात. ते आपला सर्वनाश करणार हे लक्षात घेऊन जाट घाबरून आपला प्राण वाचविण्यासाठी जयाजी शिंद्यांच्याकडे जातो.

४.जयाजी शिंद्यांची जाटास मदत-"आजचे समई तुम्ही वडीलबंधु आणि मी धाकटा बंधू कळेल त्या रीतीने माझा बच्चाव करावा." [३] असे म्हणून जाटाने जयाजी शिंद्यांचे पाय धरले. जयाजी शिंदेना त्याची दया आली. "शरण आलियाचा अंगिकार करावा शरण येईल त्यास मरण चिंतू नये." असे धर्मशास्त्री वाक्यात प्रमाणे सबळ पक्ष होतच आहे." [४] असे सगळ्यांनी सांगितले आणि हेच कारण पुढे गृहकलह लागण्यास कारण झाले. जयाजी शिंदेने जाटास मदत केली ही बातमी मल्हाररावांना मिळताच शिंद्यांच्या बद्दल त्यांच्या मनात तिरस्काराची भावना निर्माण झाली. ही बातमी मल्हाररावांनी रघुनाथदादांना सांगितली. "आमचे अस्तनीतच आग्र आहे आणि जाट हस्तगत कसा होतो?" असे विषादाने सांगितले त्यावर दादासाहेबांचा विश्वास बसला नाही. शिंदे असे करणार नाहीत. पुत्राच्या सूड बुध्दीने ते बोलेले असतील तेव्हा शिंद्यांना

विचारताच शिंदे व त्यांचे साथीदार यांनी सांगितले. ''जाट तो जेरीस आला असता या निमित्य खावंदाचे गैरमर्जी जाहली तरी पुरवली परंतु जाबसाल करिता उत्तम आहे असे म्हणून सांगितले की,''दादासाहेब आम्ही धनियाचे बारगीर निमकहराम नाही. असे असता आम्ही जो मनसोबा सांगतो तो खावंदाचे मर्जीस आल्यास ऐकावा. आजिचे समयी जाटापासून खंडणी घेवून पुढे मसलत फते करावी. येक जागा राहिल्यास पदरी फौज भारी. निभावणी होणे कठीण.'' हे ऐकून दादासाहेब संकटात पडले. एकीकडे आड एकीकडे विहीर अशी स्थिती निर्माण झाली. सल्ला करावा तर मल्हारराव हातचे जातात न करावा तर शिंदे दुखावणार अशी स्थिती निर्माण झाली. शेवटी जयाजीकरवी जाटाशी तह करून साठ लाख खंडणी घेऊन रघुनाथराव देशास परत आले.

५.मारवाड प्रांत-मारवाड प्रांतात बिजेसिंग व रामसिंग हे चुलत भाऊ होते. त्यात रामसिंग हा व्यसनी असल्यामुळे बिजेसिंगाने त्याला धुडकावून त्याचे काही प्रांत आपल्या ताब्यात घेतले. तेव्हा रामसिंगाने शिंद्यांचे सहाय्य मागितले. कारण बिजेसिंग व मल्हाररावांचे सख्य होते. जयाजी शिंदे, दत्ताजी शिंदे आपल्या प्रदेशावर चालून येत आहेत ही बातमी बिजेसिंगास मिळाल्याने त्यानेही युध्दाची तयारी केली. या युध्दात बिजेसिंगाचा पराभव झाला. पुन्हा दोन दिवसानंतर नागुर गावाजवळ शिंद्यांच्या फौजेने चाल केल्यानंतर बिजेसिंगाने मल्हाररावाकडे मदत मागितली. ही संधी साधून मल्हाररावाने बिजेसिंगास सहाय्य करण्याचे ठरविले. मल्हाररावाने कारस्थान रचून बिजेसिंगास जयाजी शिंदेचा वध करण्यास लावले. जयाजी घायाळ झाले हे दत्ताजीला समजताच दत्ताजी शिंदे त्यांच्याजवळ येवून शोक करू लागले. तेव्हा घायाळ जयाजीने दत्ताजीला बजावले,''वैरी युध्दास आला आणि तू रांडेसारिखा रडतोस? हे क्षत्रीय धर्मास उचित काय? आता मजला काही होत नाही. तुम्ही शत्रु पराभव करावा.''[५] असे सांगून दत्ताजीला युध्दसाठी आवाहन केले आणि प्राण सोडला. मराठ्यांचे सामर्थ्य पाहून शेवटी बिजेसिंगास तह करावा लागला व रामसिंगाचा मुलुख त्यास परत द्यावा लागला. मल्हाररावांनी वरकरणी जयाजीच्या वधाचे दु:ख आपणासही झाले असा देखावा केला. पण शिंदे मल्हाररावाचे कारस्थान ओळखून होते. नानासाहेबांना व भाऊसाहेबांना जयाजी शिंदेच्या वधाची बातमी मिळताच त्यांनी शिंद्यांना पत्रे लिहून त्यांचे शांतवन केले. विजेसिंगाकडून एक कोटी रू. खंडणी घेऊन सैन्य पुढे गेले. तीन कोटी रूपयांचा खर्च झाल्याने शिंद्यांच्या खजिन्यात पैसा उरला नाही. ते या विवंचनेत असतानाच बुंदी येथील राजा निधन पावला. त्याचा मुलगा अजाण, नेणता असल्याने राजघराण्यातील इतर लोक राज्य बळकाविण्याचा प्रयत्न करू लागले. तेव्हा बुंदीच्या राणीने शिंद्यांच्याकडे मदत मागितली व आपल्या मुलास राज्यावर बसविण्यास पाऊण कोटी रू. देण्याचे आश्वासन दिले. ही कामगिरी शिंद्यांनी फत्ते केली.

६.नजीबखानाचे कारस्थान-फारूखसियर बादशहाची मुलगी मलकाजमानी हिचा विवाह महमदशहा यांच्याशी झाला होता. तिला सलीमगड येथे ठेवले होते. हाती सत्ता नसल्याने दु:ख तिच्या मनात सलत होते. त्यावेळी दुसरा आलमगीर पादशहा दिल्लीत राज्य करीत होता. त्यांच्या विरूध्द उठाव करावा असे तिला वाटत होते. त्याचा वजीर गाजुदीखान होता. गाजुदीखानाच्या पदरी नजीबखान हा कर्तबगार सेवक होता. त्याला बोलावून तिने आपल्या मनातील व्यथा सांगितली. नजीबखान हा अत्यंत धूर्त आणि कारस्थानी होता. त्याने मलकाजमानीस पूर्व इतिहास सांगून कोण कोण पादशाहीशी नाराज आहे व पादशहाविरूध्द उठाव करण्यास कुणाकुणाचा उपयोग होईल याची कल्पना तिला दिली. सुजाउदौला यांच्या मनात वजिरी करण्याची महत्वाकांक्षा आहे त्याला ती देण्याचे अभिवचन द्यावे. कंदारचा पादशहा अब्दाली यांचा मुलगा तैमूरशहा यांच्याबरोबर आपली मुलगी चंदाजमानी हिचा विवाह करावा आणि दिल्लीची पादशाही काबीज करण्यास अब्दालीस बोलवावे. सैन्याचे अधिपत्य आपल्याकडे असावे अशा प्रकारची योजना नजीबखानाने मलकाजमानीस सुचविली. त्यानुसार तिने सुजातदौला व अब्दाली यांच्या बरोबर करार केला. पुढे अबदालीने दिल्लीवर चाल करून पादशहा आणि गाजुदीखानास पदच्युत केले. गाजुदीखानाने आग्राच्या किल्लेदाराकडे आश्रय घेतला. तेव्हा अबदालीने गाजुदीखानास आपल्या ताब्यात द्यावे असे किल्लेदारास सांगितले. किल्लेदाराने युक्तीप्रयुक्तीने टाळाटाळ केली. दरम्यान अबदालीने सुरजमल जाटाकडे एक कोट रूपये खंडणी मागितली. जाट दहा लक्ष देण्यास कबुल झाला. त्याच दरम्यान मराठे उत्तरेत येत आहेत ही बातमी कळल्याने नजीबखानाकडे दिल्लीचा किल्ला सोपवून व पुढील वर्षी भेटण्याचे निमित्त सांगून अब्दली कंदारास परतला. त्याने मलका जमानी व तिची मुलगी चंदाजमानी यांना आपल्याबरोबर नेले.

७.नजीबखानाला आश्रय-हे वर्तमान रघुनाथराव दादा साहेब आणि मल्हाररावांना मिळाल्यानंतर आग्राच्या किल्ल्यातून गाजुदीखानास घेवून ते दिल्लीला आले व त्यास वजिरी दिली. आलमगीरास गादीवर बसवले. तेव्हा नजीबखानाने विचार केला की गलीम आपल्याला सोडत नाहीत तेव्हा त्याने मल्हाररावांकडे बचावाची मागणी केली. ''मी तुमचा धर्मपुत्र आहे माझा बचाव करावा. शरण आलिया मरण चिंतू नये हे समर्थास उचित होय.''[६] त्यामुळे मल्हाररावांनी त्याला आश्रय दिला. रघुनाथदादांनी अटकेपार झेंडे रोवले.

८.मोगल व पेशवे युध्द-पुढे मोगल व पेशवे संबंध बिघडल्यामुळे औरंगाबादमध्ये नबाब निजामअली व पेशवे युध्द झाले. या युध्दामध्ये दत्ताजी केवळ डुक्कर खळीस येतो अशा प्रकारे लढला. ह्या लढाईत प्रचंड मनुष्यबळ गेले. 'भडभुंजे लाह्या भाजतात तैसी गत जाहाली.'

९.जनकोजी शिंदे उत्तरेच्या मोहिमेवर-श्रीमंतानी जनकोजी शिंदे यांना हिंदुस्तानच्या

मोहिमेवर पाठविले. जनकोजी शिंदे चाळीस हजार फौजेनिशी राजगड, पाटणा, बुंदी कोट असे खंडण्या घेत निघाले. दत्ताजी शिंदे देशास गेले आहेत तोपर्यंत मुक्काम ठोकणे योग्य असे जनकोजीना वाटले. तोपर्यंत लाहोरकडून रघुनाथ दादा यांनी सिंद्यांची भेट घेवून सांगितले की, ''आवंदाची मसलत बुडाली तरी पुरवेल. क्रोड रूपये शिबंदी वाढली तरी चिंता नाही देऊ. परंतु नजीबखान रोहिला याचे पारिपत्य करून त्यास जिवे न सोडावे एवढी जोड आम्हास द्यावी.''[७] तेव्हा शिंदे यांनी सांगितले की आपल्या मर्जीप्रमाणे होईल. दरम्यान गंगोबा तात्याने मल्हारराव होळकर व जनकोजी शिंदे यांच्यात समेट घालून देण्याचे प्रयत्न केला. पण जनकोजी शिंदे त्यास तयार नव्हते. ''त्यांची आमची भेट आता स्वर्गी जे तुम्हास उचित दिसेल ते करावे.''[८] असा जनकोजीनी निरोप दिला. त्यानंतर स्वत: मल्हाररावांनी जनकोजीची भेट घेवून झालेल्या प्रकारावर पडदा टाकून त्यांचे शांतवन केले. पुढील मार्गी भगीरथ नदीवर पुल बांधुन नजीबखानाकडून पलिकडील प्रदेश घेण्यास सांगितले. नजिबखानाचे पारिपत्य केल्यास पेशवे तुम्हाला एक दिवस धोत्रे बडवावयास लावतील. आणि हे शिंद्यांना पटले.

१०.नजीबखानचे कारस्थान व दत्ताजीचा वध-दत्ताजी शिंदे यांनी पुल बांधल्यावर सुजाउदौला व तुम्ही मिळोन एक करोड रूपये द्यावे अशी अट घातली. आणि आम्ही आमच्या भागात जातो असे सांगून संधी मिळताच मल्हाररावांशी स्नेह वाढवून शिंदे आपल्याला केव्हा ना केव्हा भारी आहेत तेव्हा त्याचा काटा काढल्याशिवाय आपले काहीच चालत नाही म्हणून नजीबखानाने विश्वासघात केला. दत्ताजी शिंदेला सांगितले की, सुजाउदौला याजकडून कोट रू. खंडणी घ्यावी व अंतर्गत अब्दाली व सुजाला भेटून शिंद्यांच्यावर एकदम चाल करून यावे अशी योजना आखली. या युध्दात दत्ताजीचा पराक्रम बघून सगळ्यांना दहशत बसली. परंतु दत्ताजीला चारी बाजूने घेरले व घायाळ केले. दत्ताजी शिंदे घायाळ होऊन पडले असता कुतुबशहाने विचारले, ''पटेल, हमारे साथ तुम और लढेंगे?''[९] तेव्हा दत्ताजीने बाणेदारपणे उत्तर दिले, ''बचेंगे तो और भी लढेंगे!''[१०] तेव्हा कुतुबशहाने कमरेचा सुरा काढून लाथेने ढकलून, पालथा घालून दत्ताजी शिंदेचा शिरच्छेद केला. राघोबा पात्रे व राजाराम चोपदार यांनी विनंती केली एक करोड रूपये देतो पण दत्ताजींना वाचवा पण कुतुबशहाने दत्ताजीचे शिर भाल्याला टोचून शाहादाने वाजवीत निघून गेला. या युध्दात शिंद्यांचे प्रचंड नुकसान झाले. अनेक सरदार मारले गेले.

११.उत्तरेकडील स्थिती-या सुमारास मराठी सैन्याने उदगीर येथे निजामाचा पराभव केला होता. त्यामुळे नानासाहेब पेशवे त्या आनंदात असता फेब्रुवारी १६, १७६० रोजी उत्तरेकडील बातमी आली. कुतुबशहा व अबदाली यांच्याशी चौफेर युध्द करून मराठ्यांना पराभव पत्करावा लागला. दत्ताजीच्या क्रुर वधाने दु:ख, चिड, संताप अशा भावनांनी कल्लोळ माजला. मल्हाररावांची पत्नी गौतमीबाई यांनी मल्हाररावांना व जनकोजींना शत्रुंशी सामना करण्याची

विनंती केली. गौतमाबाईने तर मल्हाररावांची निर्भत्सनाच केली. भाऊसाहेबांना ही बातमी कळताच "दुधाचे रांजणीत कांज्याचे शिंतोडे पडले."[११] अशी गत झाली. शिंदे आणि होळकर यांनी एकमेकांशी कलह करून पेशव्यांचे नुकसान केले. अशावेळी उत्तरेत कोणाला तरी पाठविले पाहिजे असा निर्णय घेण्यात आला. अबदालीचे पानिपत केल्याशिवाय त्यांचा गर्व नाहीसा होणार नाही असे पेशव्यांना वाटले.

१२.भाऊसाहेबांचे उत्तरेकडे प्रयाण-भाऊसाहेबांना वाटले,"पाण्याआधी वळण बांधिता उत्तम नाहीतर शेणामेणाचे, लोखंडाचे जालियावर पुढे भारी पडेल."[१२] नानासाहेबांनी रघुनाथ दादांना उत्तरेस जाण्यास विनंती केल्यानंतर हिंदुस्तानात जाणेची मला आज्ञा करावी तरी ऐंशी हजार फौजेस भर नालबंदी देवून समागमे क्रोड रूपये खजिना द्यावा."[१३] अशी न जमणारी अट घालून अप्रत्यक्ष नकार दिला. दादासाहेबांची ही अट ऐकताच "आयत्या पिठावर रेघा कोणीही ओढील"[१४] अशा शब्दात बळवंतरावांनी प्रतिक्रिया व्यक्त केली. बाहेर पैसा मिळवून घरास खजिना आणावा तो घरचा खजिना नेल्यावर बाहेर यांनी काय मिळवावे? भाऊसाहेबांनी स्वत: रंगपंचमीदिवशी आपण जाण्यास तयार आहोत असे नानासाहेबांना सांगितले. १३ मार्च१७६० या शुभ मुहुर्तावर भाऊसाहेब आपल्या फौजेनिशी शनिवारवाड्याच्या दिल्ली दरवाजातून सर्वांचा निरोप घेवून बाहेर पडले. नानासाहेबांनी त्यांच्याबरोबर विश्वासरावांनाही पाठविले. नानासाहेबांशी त्यांच्याबरोबर विश्वासरावांनाही पाठविले. या स्वारीत दमाजी गायकवाड, बळवंतराव मेहेंदळे, समशेर बहादूर, यशवंतराव पवार, सदाशिव पुरंदरे, संभाजी माणकेश्वर ही सरदार मंडळी होती. इब्राहीमखान गारदी हा आपल्या तोफखान्यासह सुमारे ३००० शिस्तबध्द शिपायांसह बरोबर होता. भाऊसाहेबांच्या दिमतीस हुजुरातीचे सैन्य होते. त्याबरोबर अनेक सरदारांची बायकामंडळी व बाजारबुणगे होते. इब्रामखान गारद्याने भाऊसाहेबांच्याकडे शंका व्यक्त केल्यावर "निदान प्रसंग पडला तरी तुम्हास सोडून निघणार नाही. जेथे तुम्ही गाडून उभे रहाल तेथे मी राहीन यास अंतर करणार नाही."[१५] असे उत्तर दिले.

१३.भाऊंनी सल्ला धुडकावला-

माळवे प्रांतात असताना भाऊंनी दम खात यावे. घाई करू नये अशी जनकोजी शिंदे व मल्हारराव होळकर यांना पत्र पाठवून सूचना दिली. अनुभवी मल्हाररावांना भाऊसाहेब आणि विश्वासराव मोहिमेवर आलेले आवडले नाही. सुजाउदौल्ला आणि अबदाली हे काही सामान्य नाहीत. 'मोहरा इरेस पडावा' असा अर्थ नाही. परंतु बळवंतरावांच्या सल्ल्यानुसार त्यांच्या पत्राकडे दुर्लक्ष केले आणि आपली फौज-दौड पुढे नेली.

भाऊसाहेबांची फौज ग्वालेर जवळील कुंवारी नदीजवळ आलेली आहे असे समजताच 'तुम्ही चमेलजवळ छावणी करावी' असा मल्हाररावांनी सल्ला दिला. पण तोही सल्ला धुडकावून

भाऊसाहेब गंभीरा नदीच्या तिरापर्यंत येऊन पोहचले. तेव्हा स्वत: जनकोजी शिंदे व मल्हारराव होळकर यांनी भाऊंची भेट घेऊन आपले येणे हिताचे नाही हे पटवून दिले. आपल्या बरोबर भाऊसाहेबांनी तिर्थपर्यटनासाठी बायका मुलेही आणली. त्यांचे रक्षण करण्यासाठी आग्रा येथील किल्लेदाराशी वाटाघाटी करून त्यांच्याशी स्नेह निर्माण करून त्याला दहा हजार रूपये देऊन निदान संकट आलेच तर त्यांना संरक्षण मिळावे ही सोय करून भाऊसाहेब पुढे यमुना पार करून दिल्लीत पोहोचले.

१४.दिल्लीतील छतप्रकरण-भाऊसाहेबांनी दिल्लीत प्रवेश करताच सुरजमल जाट व गाजुदीखान यांच्या मदतीने दिल्लीचा किल्ला २ ऑगस्ट १७६० रोजी जिंकला. या युध्दात जनकोजी शिंदे व मल्हारराव होळकरांनी फार मोठा पराक्रम केला. गाजुदीखानाने किल्ल्यातील आलमशहाचा वध केला. तेव्हा गाजुदीखानास वजारत द्यावी असा आग्रह सुरजमल जाटाने धरला. त्याला मल्हाररावांनीही पाठिंबा दिला. परंतु बळवंतरावाच्या सल्ल्याने भाऊसाहेबांनी नारोशंकरास 'राजेबहादरच्या' हा किताब देऊन त्यास वजिरी दिली. विश्वासरावास भाऊ गादीवर बसविणार व त्याला बादशहा करणार अशी आवई सैन्यात पसरली. फौजेचा पगार चुकता करण्यासाठी भाऊसाहेबांनी बादशाही सिंहासनाचे चांदीचे छत फोडले. त्याला सुरजमल जाटाने विरोध केला. तुम्हाला खर्चाची टंचाई जाहाली तर आम्हाला आज्ञा करावी. मी पाच लक्ष रूपये देतो. तेव्हा भाऊसाहेबांनी जाटांचा अपमान केला. ''आम्ही काही दक्षिण सोडून तुमचे बळावर आलो नाही. आमचे चित्तास येईल ते करू. तुम्ही राहाल तरी रहावे नाही तर आपले ठिकाणास जावे. गिलच्यांचे पानिपत केल्यावर तुम्ही आम्ही पाहून घेऊ.''[१६] तेव्हा जाट, शिंदे व होळकर दु:खी झाले. त्यांनी सुरजमल जाटास निघून जाण्यास सल्ला दिला. शिंदे आणि होळकरांनी सुरजमल जाट यांच्या वकीलांकडे सांगितले, ''तुम्ही आज रात्रौ हर तरा करून कूच करून निघोन जावे. भाऊसाहेब यांचा गोट लांब आहे. त्यास कळो न देता निघोन जावे. इतक्यावर तुमचे आमचे इमान उगवले. इत:पर आम्हास शब्द नाही.''[१७]

१४.कुंजपुऱ्याचा विजय-दत्ताजी शिंदेचा वध करणारा कुतुबशहा कुंजपुरीत आहे असे भाऊसाहेबांना समजल्यावर त्यांच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. त्यांनी कुंजपुऱ्यावर हल्ला केला. मराठ्यांनी या युध्दात पराक्रमाची शर्थ केली. दत्ताजी शिंदेचा वध करणारा कुतुबशहा दमाजी गायकवाडांच्या हाती जिवंत सापडला. त्यांनी हत्तीवर घालून भाऊसाहेबांच्या समोर आणला. कुतुबशहाने पन्नास लाखाच्या मोबदल्यात आपणाला सोडून देण्याचा प्रस्ताव मांडला. पण दत्ताजी शिंदेच्या वधाला कारणीभूत असल्यामुळे भाऊसाहेबांना अतिशय चिड होती. ''क्रोध समुद्र ढवळला' अशी भाऊसाहेबांची स्थिती झाली. त्यांनी ज्या पध्दतीने दत्ताजी शिंदेचा शिरच्छेद केला त्याप्रमाणे कुतुबशहाचाही शिरच्छेद करण्यास हुकूम दिला. मल्हाररावांनी आणि जनकोजी

शिंदे यांनी यास वाचवून त्याचे हातून महत्कार्य संपादून घ्यावे, यास मारल्याने दत्ताजी शिंदे उठत नाहीत असा सल्ला दिला. परंतु भाऊसाहेबांनी त्याकडे दुर्लक्ष केले. उलट मरणापूर्वी कुतुबशहाने प्यावयास पाणी मागितले तेव्हा या मात्रागमणियास लघुशंका प्राशन करवणे.''[१८] असा हुकुम देऊन सिरच्छेद केला. तसाच सैदखान याचाही सिरच्छेद केला.

१२.अचानक संकट-कुतुबशहाच्या हत्येनंतर मल्हारराव व जनकोजी शिंदे भाऊसाहेबांना दिल्लीला जाण्याचा सल्ला देतात. तो सल्ला भाऊसाहेब धुडकावून लावतात. कुतुबशहा व सैदखान यांच्या वधाच्या बातमीने चिडलेला नजीबखान व अबदाली यांनी आपली प्रचंड फौज घेवून पानिपत येथे तळ ठोकला. त्यामुळे अचानक आलेल्या संकटामुळे भाऊसाहेब गोंधळून गेले. त्यांनी मल्हारराव होळकर, जनकोजी शिंदे, दमाजी गायकवाड, यशवंतराव पवार ह्या सरदारांना सल्ला विचारला. तेव्हा मल्हारराव होळकरांनी, ''हा सल्ला बळवंतराव यांना विचारावा आम्हास काही मसलत सुचत नाही. आमची साठी बुध्दी नाठी जाली.''[१९] म्हणून कानावर हात ठेवले. अनेक सरदारांनी आपण दिल्लीकडे जावे असा सल्ला दिला. इब्रामखान यास विचारले असता,''तुम्ही देशाचा मोगल बंदेखान अली याजप्रमाणे गोल बांधून चालिला तरि तुमची निभावणी करून देऊ त्यांनी गनिमी कावा केला तरी आमचा यत्न राहिला.''[२०] आणि तोच सल्ला भाऊसाहेबांनी स्वीकारला. अबदालीच्या सैन्याची बातमी काढण्यासाठी गेलेल्या चारशे सैनिकदुतांना आपले प्राण गमवावे लागले. त्यामुळे दिल्लीकडेही जाता येईना. केवळ अडीच कोसावर अबदालीचे प्रचंड सैन्य व त्यांनी उभ्या केलेल्या तोफा होत्या. दोन महिने गेले तरी मार्ग निघेना.चारीबाजूने मराठी सैन्याला घेरले गेले.

१३.सैन्यात अन्नदुष्काळ-मराठ्यांची रसद तोडली जात होती. त्यामुळे फौजेची स्थिती फारच हलाखीची झाली. सर्व अन्न धान्य संपले. सैनिक उपासपोटी राहु लागले. दिवसेंदिवस धान्य महाग होऊ लागले. वैरण मिळेनासी झाली. अशा वेळी आपला निभाव लागणार नाही असे भाऊसाहेबांना वाटले. त्यांना पुण्याहून कुमक मागविणे ही योग्य वाटेना. ही स्थिती विश्वासरावांना कळताच त्यांनी जनकोजी शिंदेंना एकांतात बोलवून पुण्याला पत्र पाठविण्यास विनंती केली. ''भाऊसाहेब तो अभिमानी पुरूष यांस गर्द होतील. परंतु व्यंगोक्त लिहिणार नाही. यास्तव संप्रत तरी आणखी पन्नास हजार फौज व क्रोड रूपये खजिना पांठविला तरी तुमचे आमचे दर्शन होईल नाही तर पत्र लिहिले हीच भेट समजावी. नानासाहेब, मजसारिखे पुत्र आपणांस होतील परंतु भाऊसाहेबांसारखे बंधु मिळणार नाहीत.''[२१] हे भाऊसाहेबांना समजताच ते जनकोजी व विश्वासरावांना म्हणाले, ''तुम्हास जीव जगवणे असेल तर उत्तम आहे. तुम्ही इथून निघून जावे. दैव असेल तसे आमचे होईल. तुम्ही पत्र पाठविण्याच्या वाटेत जावू नका.''[२२]

१४.गोविंदपंत बुंदेले यांचा वध-गोविंदपंत रसद आणण्यासाठी गेले ते तिकडेच बुंदेलखंडावर

राहिले. नंतर वीस लक्ष रूपये घेवून दिल्लीस आले. अबदालीने आपल्या फौजेला होळकरांचे निशाण लावून १७ डिसेंबर १७६० रोजी गोविंदपंत बुंदेल्यावर पाठविले. निशाणांना गोविंदपंत फसले. अबदालीच्या सैन्याने गोविंदपंतांची फौज लुटली. सर्व खजिना लुटला व गोविंदपंताचा शिरच्छेद केला. बळवंतरावांनी या पराभवाचे खापर शिंदे-होळकरांच्यावर फोडले. हा आरोप ऐकून अपमानास्पद बोलणी ऐकण्यापेक्षा ''मारता मारता मरावे हे उत्तम.'' असे ठरवून दुराणीवर हल्ला चढविला. प्रचंड लढाई झाली.'' जैसे पूर्वी रामायणी राक्षस व वानर मारले किंवा भारती कौरव पांढव लढले त्याप्रमाणे लढाई जाहाली.'' या लढाईत मराठ्यांनी फार मोठा पराक्रम केला. पण ऐन वेळी बळवंतरावांनी कुमक केली नाही. त्यामुळे मोगलांचा पाठलाग करता आला नाही. अबदालीला या युध्दातून पळ काढावा लागला. फौजेत सर्वत्र बळवंतरावांच्या या हीन कृत्याची निंदा होऊ लागली. तेव्हा आपण स्वतंत्रपणे युध्द करू या उमेदीने विश्वासरावांना घेवून स्वत:ची फौज घेवून ईश्वरे यश दिले तरी उत्तम, नाहीतरी पुन: तुमची आमची भेट स्वर्गी होईल.'' असे वक्तव्य करून बळवंतराव दुराणीवर चालून गेले.

१५.बळवंतरावांचा मृत्यू-अबदालीने तग धरून युध्दाची पुन्हा तयारी केली. या युध्दात दुराणीची फौज बळवंतरावाच्या फौजेला भारी पडली. बळवंतरावांना गोळी लागून ते या युध्दात ठार झाले. दुराणीने बळवंतरावाच्या छातीवर पाय देवून शिर कापण्याचा प्रयत्न केला. परंतु खंडेराव नाईक निंबाळकर यांनी शिर कापू दिले नाही. त्यांच्या मुडद्यावर पडले. हे दृष्य पाहून शिंदे होळकरांनी मध्येच घोडी घालून खंडावा पाडला. या युध्दात पाच हजार सैनिक ठार झाले. मुडद्यावर मुडदे पडले. रक्ताचे पाट वाहिले. बळवंतरावांच्या पत्नीला ही बातमी समजताच तिला दु:ख आवरेना. ''राव तुम्ही आम्हावर का रूसला ? आमचे हातचा विडा घेतला नाही. ईश्वरे आम्हास एवढे निर्वाण का दाखविले.''[२३] असा शोक करून आपल्या पतीबरोबर सती गेली. ती सती जाणार हे कळताच तिच्या मुलाने शोक केला. आम्ही अन्न पाणी कोणास मागावे? आणि कोणावर रूसावे?''[२४] त्यावेळी तिने आपल्या मुलाची समजूत घातली की, तुम्ही अन्नपाणी ईश्वराजवळ मागावे आणि ईश्वरावर रूसावे.''

१६.विश्वासरावांचा मृत्यू - बळवंतरावांच्या मृत्यूनंतर सर्व लहान थोर सरदारांनी भाऊसाहेबांना सांगितले की, भाऊसाहेब आम्हास रणात मारावे परंतु अन्नाविणा मारू नये, गिलच्यांची शक्ती दिवसेंदिवस वाढत आहे. अनेक मनुस्ये, घोडी मेली. तेव्हा गिलच्यांच्या पुढे निभाव लागणार नाही. तेव्हा येथून पार करून जाण्याचा विचार कसा होईल ते पहावे पण त्याकडे दुर्लक्ष करून गोट बांधून भाऊसाहेब दिल्लीकडे निघाले. पण पुन्हा त्यांनी आपली ऐनवेळी रचना बदलली त्यामुळे सैनिक गोंधळात पडले. इकडे मोगलही युध्दास सज्ज झाले होते. दिल्लीला जाण्यापूर्वी मराठ्यांचा पराभव करावा या उद्देशाने ते तयार होतेच. युध्द सुरू झाल्यानंतर विठ्ठल

शिवदेव, यशवंतराव पवार, दमाजी गायकवाड यांना माघार घ्यावी लागली. विश्वासरावांना अचानक गोळी लागून त्यांचा मृत्यू झाला. ही बातमी भाऊसाहेबांची स्त्री पार्वती बाईंना कळल्यावर त्यांनी उर व कपाळ बडवून घेतले. या युध्दात इभ्रामखान गारदीही घायाळ झाला. अनेक नामांकित सरदार ठार झाले. विश्वासराव ठार झाल्यावर नानासाहेबांना तोंड कसे दाखवायचे असे भाऊसाहेबांना वाटले. त्यानी विश्वासरावाचा मुडदा अंबारीत घालून वर शालजोडा घालून विश्वासरावांचा मृत्यू झाला नाही असे भासविले.

१७.युध्दाचा शेवट - नानासाहेबांना पुण्यात जावून तोंड दाखविण्यापेक्षा युध्दात मरण पत्करलेले बरे म्हणून भाऊसाहेबांनी पुन्हा युध्दात १४ जानेवारी १७६० रोजी उडी घेतली. एकच धांदल उडाली. घे, घे, मार-मार अशा गर्जना करत सर्व सैनिक त्वेषोने लदू लागले. मुडद्यावर मुडदे पडू लागले. रक्ताचे पाट वाहू लागले. धडे एकीकडे तर मुंडकी एकीकडे पडू लागली. अबदालीच्या प्रचंड सैन्यापुढे मराठ्यांचा निभाव लागेना म्हणून काही सरदार पाठ करून पळून जावू लागले. अशावेळी भाऊसाहेब सोनजी भापकरांना म्हणाले, ‘‘सोनजी बाबा या समयी निघावयाचे नव्हते. तुमचा भरवसा बहुत धरिला होता.'' तुकोजी शिंदे भाऊसाहेबांना म्हणाले, ‘‘भाऊसाहेब ! तुम्ही वाचला तरी आवघ्यांचा सूड घ्याल नाही तरी तुमचे मागे अवघ्याच गोष्टी आटोपल्या.''[२५] पुण्यात जावून नानासाहेबांना तोंड दाखविण्यापेक्षा मरण पत्करलेले बरे म्हणून लढू लागले. मध्येच निशाण गुंडाळून काही सैनिक पळू लागले. भाऊसाहेबांनी शाहदाने वाजविण्यास आज्ञा केली. शाहदाने वाजविल्यामुळे लोक माघारे फिरतील असे भाऊंना वाटले. पण पळ काढणारे माघारे फिरलेच नाहीत. भाऊसाहेबांच्या तोंडाला खरस फुटली. ते ‘हाणा मारा’ म्हणू लागले. त्यांच्याजवळ पाच पन्नास लोक होते तेवढेच लढत होते. बाकीचे जिकडे तिकडे पळत होते. पूर्वी युध्दात अति महारथी झुंजले त्याप्रमाणे भाऊसाहेब लढले. पण त्याचा काहीच उपयोग झाला नाही. दुराणी व नजीबखान रोहिला यांनी भाऊसाहेबांच्या अंगावर चाळीस हजार फौज घातली. त्यावेळी न भूतो न भविष्यति असे युध्द झाले. या गोंधळात भाऊसाहेबांचा व जनकोजी शिंदे यांचा मृत्यू कसा झाला हे कुणालाच समजले नाही. ना त्यांची प्रेते मिळाली ना थांगपत्ता लागला.

१८.सैनिकांची पळापळ - युध्दात आपला निभाव लागणार नाही हे समजताच मराठी सैन्याने पळ काढला. जिकडे तिकडे दिशा मिळेल तिकडे ते पळू लागले. भाऊसाहेबांच्या पत्नीला-पार्वतीबाईंना बुणग्यांच्या बरोबर पळून जावे लागले. बाईचे पुण्य सबल म्हणून वाचली. नाना फडणविसांच्या मातोश्रींचे काय झाले ते कळलेच नाही. तीन लक्ष रूपये देवून विश्वासराव, संताजी वाघ, यशवंतराव पवार यांचे मुडदे सोडवून घेतले. मुडदे मिळविण्यासाठी लाच द्यावी लागली. प्रचंड लुटालुट झाली. ‘‘ज्यास गाढव घेण्याची शक्ती नव्हती त्यास हत्ती प्राप्त झाला.''

कित्येक बायका धरून नेल्या. कित्येक जिवे मारिल्या. तिच गत पुरूषांचीही झाली.

१९.गिलच्यांनी कत्तल केली.-गिलच्यांनी पानिपत शहराचा बंदोबस्त करून खंदकातील मालमत्ता लुटली. गिलचे शाळवाची कणसं कापावीत तशी माणसांची डोचकी कापीत. कुतुबशहा व सैदखान यांच्या पुत्रांनी सैनिकांचा पाठलाग करून चार हजार फौजेची कत्तल केली. तसेच अहमदखान लंगडा यांच्या पुत्राने बहादरगडानजीक पाच हजार सैनिकांची कत्तल केली. तेव्हा पानिपत शहरात दवंडी देवून कत्तल करण्याची थांबविली. मालमत्ता घेवून सोडून देण्यास सांगितले. नाना फडणवीस यांच्या पत्नीला फाटके वस्त्र नेसून अंगाला माती लावून शहरातून बाहेर पडावे लागले. काही लोक दिल्लीकडे पळाले. दिल्लीतील वाणी बकाल बायका लष्करांच्या लोकांना मारून लुटु लागल्या.

२०.जाटांचे सहकार्य-वाताहत झालेने सैनिक एक एक असे एकत्र येवून मथुरेत आले. तिथे हजारो माणसे नागवे-उघडे केवळ भिकारी भीक मागत. अंगावर वस्त्रे नसलेले कळाहीन चीलची भाजी खात जाटांच्या मुलुखात येवून पोहचले. जाटांना त्यांची दया आली. त्यांनी कोणासही न छळता ज्यास जसे अनुकूल पडेल ते अन्न आणि वस्त्रे दिली. वाटेतील एका सावकाराने खंडणीभर उडीद वाटणी करून दिले. दोन मणाच्या भाकऱ्या करून त्याचे पैशा-पैशाएवढे तुकडे करून दिले. पुढे नाना पुरंदरे गंगोबातात्या असे शे पन्नास मजल करीत एकत्र येथे आले तेथे होळकर व काही बायका यांची भेट झाली. तेथून मजल-दरमजल करत अकरावे दिवशी पौष ५ मंगळवार या दिवशी भिडीस आले व तेथून मल्हारराव, नाना पुरंदरे, पार्वतीबाई एक महिना ग्वालेरास राहिले. नाना पुरंदरे काही बैराग्यांना घेवून भाऊसाहेबांचा शोध घेण्यासाठी उत्तरेत गेले. त्याच दरम्यान घायाळ समशेरबहादूर कुंभेरीस आला. जाटांनी त्याला मदत केली. परंतु पुण्यात जाऊन नानासाहेबांना तोंड काय दाखवावे म्हणून भाऊ ! भाऊ ! म्हणून देह सोडला.

२१.नाना साहेबांचा शेवट-पुण्याहून नानासाहेब भाऊसाहेबांना मदत करावी या हेतुने व दिल्लीत जावून गिलच्यांचे पानिपत करावे असा निश्चय करून नर्मदेपर्यंत येवून पोहचले. पण तिथल्या मुक्कामी पळाचे लोक उघडे बोडके आल्याचे कळले. अशा वेळी पुढे जाण्यास गोपिकाबाईनी विरोध केला. एकंदर परिस्थिती पाहून बऱ्हाणपुरापर्यंत आले. तिथेच ग्वालेरहून पार्वतीबाई, मल्हारराव, नारोशंकर आले आणि नानांची भेट घेवून पानिपतचा सर्व वृत्तांत सांगितला. ते सारे ऐकून नानासाहेब 'भाऊ ! भाऊ !' म्हणून शोक करू लागले. नंतर नानासाहेब निजता, उठता, जेवता भाऊंचा शोक करत पुण्यात दाखल झाले. दिवसेंदिवस भाऊ ! भाऊ ! म्हणून शोक करून नानासाहेबांचे शरीर कृश झाले. बुध्दीभ्रंश झाला. लोकांना शिवीगाळी करू लागले. राज्यकारभार विपरीत होऊ लागला. पुत्रशोक व बंधुशोकाने विव्हल होऊन २३ जून १७६१ रोजी नानासाहेब पुण्यात वैकुंठलोकी गेले.

## व्यक्तिचित्रण

भाऊसाहेबांची बखर ही व्यक्तिचित्रणाच्या दृष्टीने उत्कृष्ट बखर आहे. बखरकारांनी इतिहासातील घटना गोळा करून त्या व्यक्तिदर्शनातून वाचकांच्या समोर उभ्या केल्या आहेत. बखरकाराने त्या व्यक्तिचे गुणधर्म स्वभाव रेखाटले आहेत.

''सर्वच मंडळी नव्या उमेदीची ! त्यामुळे विवेकाचे भान नाही, भावनांचा पोच नाही. स्वार्थ व अभिमान यांना मुरड घालता आली नाही.'' त्यामुळे मराठेवीर 'बलवंत' असूनही 'यशवंत' झाले नाहीत. अशा परस्परभिन्न स्वभावांच्या व्यक्तिरेखा उभ्या करून बखरकाराने मानवी मनाचे गूढ शोधण्याचा येथे प्रयत्न केला आहे.

मल्हारराव होळकर-

पराक्रमी-मल्हाररावांच्या स्वभावातील अनेक सूक्ष्म छटा बखरकाराने भाऊसाहेबांच्या बखरीत टिपल्या आहेत. मल्हारराव शूर, पराक्रमी होते. त्यांनी अनेक मोहिमा स्वत:च्या बळावर गाजविल्या आहेत. कुंभेरीच्या वेढ्यात त्यांचा मुलगा खंडेराव ठार होतो तेव्हा संतप्त होऊन ''सुरजमल जाट यांचा शिरच्छेद करीन व कुंभेरीची माती यमुनेत टाकीन तरीच जन्मास आल्याचे सार्थक नाहीतर प्राणत्याग करीन,'' अशी प्रतिज्ञा ते करतात.

धूर्त, कारस्थानी-जाट व जयाप्पा शिंदे पगडीभाई झाल्यावर 'आमचे अस्तनीतच दुश्मन आहे.' असे रघुनाथरावांना ते सांगतात. वरकरणी बाजू घेवून अंतर्गत बिजेसिंगास मसलत करून कार्य सिध्दीस न्यावे असे सांगतो. बिजेसिंग जयाजी शिंदे यांचा वध करतो. जयाप्पाच्या वधानंतर त्यांना आनंद होतो. यातून त्यांचा धूर्त कारस्थानी स्वभाव दिसून येतो.

मतलबी-पेशवाईत आपले वर्चस्व कायम रहावे यासाठी ते जिवाचा आटापिटा करतात. नजीबखानाला ते आपला 'धर्मपुत्र' मानतात व त्याचे रक्षण करतात.दत्ताजी शिंदे शत्रूशी लढता लढता घायाळ होऊन धारातीर्थी पडतात त्यामुळे जनकोजीला रणातून माघार घ्यावी लागते. तरी सुध्दा मल्हारराव त्यांच्या मदतीला जात नाहीत कारण शिंद्यांचे पारिपत्य झाले की, उत्तरेत आपले वर्चस्व राहील असे त्याना वाटते. त्यांचे वागणे दुटप्पी आहे. एकीकडे ते नजीबखानाला फुस देतात. तर दुसरीकडे शिंद्यांच्या बद्दल आपल्या मनात प्रेम आहे असे दाखवतात. शिंद्यांच्या मनातील द्वेष काढण्यासाठी मल्हारराव गंगोबा तात्यास पाठवितात. गौतमाबाई जेव्हा त्यांची निर्भत्सना करते-''सुभेदार, तुमची उमर साठ वर्षांची झाली--- या पृथ्वीवर कीर्त मिळवून किती पन्नाशा जगणे आहे?'' हे ऐकल्यानंतर मल्हारराव दातओठ खावून म्हणतो की, ''तुझे चित्त पाहिले! असा हा मल्हारराव आपल्या पत्नीलाही फसविण्याचा प्रयत्न करतो. यातून मल्हाराराव्यांचा स्वार्थी मतलबीपणा दिसून येतो. पण तो पत्नीपासून त्यानी दडविला आहे. अबदालीशी ते

लढतात पण त्यात त्याना अपयश येते.

अनुभवी-मल्हारराव तोंडाने फटकळ आहेत. मानी आहेत. पेशव्यांनी आपले म्हणणे ऐकावे असे त्यांना वाटते. भाऊसाहेब दिल्लीकडे येण्यास निघतात. त्यावेळी त्याना पत्रातून ते खडसावून लिहितात, "तुम्हास माळवे प्रांती छावणीस रहावे म्हणून लिहिले. येथपर्यंत यायचे कारण काय? भोंवते लोक मिळाले तेही बेवकूब. मोहरा इरेस आणून घातला." ह्या उद्‌गारावरून अनुभवी दूरदृष्टीचा प्रत्यय येतो.

वचननिष्ठ-सुरजमल जाटाला मल्हारराव जेव्हा निसटू देतात तेव्हा भाऊसाहेब "केवळ अवघे तुमचेच मनसुबे आहेत. इत:पर दरबारास बोलवू तेव्हा येत जावे." असे म्हणतात. तेव्हा "चाकर आहो, चाकरी सांगाल ती करून घरी स्वस्थ बसू." असे म्हणून संयम राखतात. दिलेले वचन पाळण्याचा इनामीपणा मल्हाररावांजवळ आहे. जो जाट पेशव्यांना सहाय्य करतो त्यालाच लुटण्याचा विचार जेव्हा भाऊसाहेब करतात. तेव्हा मल्हारराव त्यांना पळून जाण्यास सहाय्य करतात. यातून त्यांचा प्रामाणिकपणा आणि वचननिष्ठा दिसून येते.

स्पष्टोक्ती-कुंजपुऱ्यावरील हल्ल्यात भाऊंना यश येते तेव्हा मल्हारराव त्यांना तेथून दिल्लीस जावयास सांगतात. पण भाऊ ती गोष्ट ऐकत नाहीत. त्यामुळे मल्हारराव दुखावले जातात. मल्हाररावांनी सल्ला दिला तेव्हा भाऊंनी तो ऐकला नाही आणि अबदालीने एकाएकी चाल केल्यावर जेव्हा भाऊसाहेब सल्ला विचारतात तेव्हा बळवंतरावाला विचारावे असे म्हणून कानावर हात ठेवतात. आमची साठी बुध्दी नाठी झाली. असे बोलतात. पानिपतच्या युध्दातून मल्हारराव काढता पाय घेतात. बखरीच्या प्रारंभी मल्हाररावांचा स्वभाव करारी, महत्वाकांक्षी, कारस्थानी दिसून येत होता. पण पुढे त्यांच्या स्वभावात विकलता, हतबलता दिसून येते. धूर्तपणा, एकवचनीपणा, कावेबाजपणा, स्वाभिमान, मानी स्वभाव, महत्वाकांक्षा ह्या अनेक रंगांनी रंगलेले मल्हारराव शेवटी मात्र निराशेने काळेठिक्कर पडलेले दिसतात.

### भाऊसाहेब-

कर्तबगारी-भाऊसाहेबांच्या बखरीत दत्ताजी शिंदे यांच्या वधानंतर उत्तरेकडील जाण्याच्या मोहिमेपासून भाऊसाहेबांचे आगमन होते. शिंदे होळकरांचा गर्वपरिहार करावा आणि आपला पुरूषार्थ दाखवावा या दृष्टीने उत्तर हिंदुस्थानाच्या मोहिमेवर जाण्याचा भाऊसाहेब निश्चय करतात. शिंदे-होळकरांनी एकमेकांच्या द्वेषाने पेशव्यांचे नुकसान केले. अवघे हिंदुस्तान एकत्र झाले, बळावले. तेव्हा 'पाण्याआधी वळण बांधायला हवे.' असा निश्चय करतात. उत्तरेकडे आपण स्वत: जाण्यात राज्यकर्ता या नात्याने आपले कर्तव्य समजतात. इभ्रामखान गारद्याने शंका व्यक्त केल्यावर 'निदान प्रसंग पडला तरी तुम्हास सोडून निघणार नाही. तुम्ही गाडून उभे रहाल

तेथे मी राहीन.' असे सांगतात.

हट्टी स्वभाव-भाऊसाहेबांनी स्वत: उत्तरेकडे येवू नये असे मल्हाररावांना वाटते पण दत्ताजीसारख्या वीराचा बदला घेण्यासाठी ते जातात. गाजुदीखानाला वजिरी द्यावी असा आग्रह अनेक मराठी सरदार धरतात पण भाऊसाहेबांच्या आग्रही व हट्टी स्वभावामुळे ते नारोशंकरास वजिरी देतात. त्यामुळे त्यांचे जवळचे सहकारी मल्हारराव व जनकोजी शिंदे दुखावतात या गोष्टीचा त्यांना विसर पडतो. खर्चाची अडचण भासल्यामुळे जाटासारख्या हितकर्त्याचा ते अपमान करून छताचे रूपे काढतात. जाट योग्य सल्ला देत असतानाही जाटानाच लुटण्याची दुर्बुध्दी त्यांना सुचते. त्यामुळे त्याचे दुरगामी परिणामही भोगावे लागतात.

दूरदृष्टीचा अभाव-आपण पानिपतचे युध्द जिंकून निश्चितपणे परत येवू असा आत्मविश्वास त्यांना वाटतो. अशा वेळी माघार घेणे भ्याडपणाचे लक्षण आहे असे त्यांना वाटतो. कुंजपुऱ्यातील हल्ल्यात मिळालेल्या यशामुळे भाऊसाहेबांना गिलच्यांच्या सामर्थ्याचा व त्यांच्या डावपेचाचा अंदाज नसतो. ''सुभेदार, तुमचे अंगी दुराणीचे भय. शहारे म्हणजे हीव अंगात शिरले ते अद्यापी जाईना.'' असे म्हणून बळवंतराव मल्हाररावांचा उपहास करतात. त्यास भाऊसाहेबांचीही मूक संमती असतेच. वास्तविक भाऊसाहेबांसारख्या मुत्सद्दी पुरूषाने दूरदृष्टीचा विचार केला असता तर पुढील योजना अधिक कौशल्याने तयार करता आली असती. खरे म्हणजे भाऊसाहेबांना शत्रूच्या सामर्थ्याचा अंदाजच करता आला नाही. आपल्या ताकदीवर तर त्यांचा नको तेवढा विश्वास होता. पुण्यास तोंड कसे दाखवावे? या मानीपणापोटी ते युध्दाचा निर्णय घेतात. सहकारी सरदारांचे मत ते मानीत नाहीत.

स्वाभिमानी-पानिपतवरील अन्नाची टंचाई, रसद नाही, पैशाची कुमक नाही, फौज अन्नाने बेजार झाली, अशावेळी पुण्याकडून कुमक मागविणे भाऊंना पटले नाही. दत्ताजी आणि विश्वासराव पुण्याला पत्र पाठवितात असे समजताच भाऊसाहेब दत्ताजींना म्हणाले, ''तुम्हास जीव जगवणे असेल तर उत्तम आहे तुम्ही इथून निघून जावे, दैव असेल तसे आमचे होईल.'' यातून त्यांचा स्वाभिमान दिसून येतो. विश्वासरावांच्या मृत्यूमुळे त्यांना धक्का बसतो. पानिपतच्या युध्दात सर्वनाश होत असताना तुकोजी शिंदे म्हणतात, ''भाऊसाहेब तुम्ही वाचला तर अवघ्यांचा सूड घ्याल नाहीतर तुमचे मागे अवघ्याच गोष्टी आटपल्या.'' तेव्हा भाऊसाहेब म्हणतात, ''पुण्यात जावून भाऊसाहेबांना कसे तोंड दाखवावे त्यापेक्षा रणात मरण पत्करलेले बरे.'' यातून त्यांचा स्वाभिमान दिसून येतो.

भाऊसाहेब अभिमानाने पुण्याहून पानिपतकडे गेले आणि शेवटी अभिमानामुळे पेचात आले.

पराक्रमी-भाऊसाहेब पानिपतच्या युध्दात महान सेनानी म्हणूनच अवतरतात. 'हाणा मारा'

असा ध्यास त्यानी घेतला होता. तोंडापुढे ओळखीचा माणूस आला की मानेने आज्ञा देऊ लागले. युध्दभूमी रणधुमाळीमध्ये ते घुसले होते. हत्तीवरून घोड्यावर, घोड्यावरून पायी अशी जातीनिशी लढाई ते करीत होते. संकट कोसळले तरी त्यांची हिंमत मोठी होती. सिंहाचे काळीज असणाऱ्या या सेनापतीने मराठी सैन्याला धीर देण्याचा, त्याला प्रोत्साहन देण्याचा आणि विजय मिळविण्याचा अटोकाट प्रयत्न केला. भाऊसाहेबांसारखा दुसरा मनुष्य पराक्रमी होणार नाही असे बखरकारास वाटते. म्हणून 'भाऊसाहेब गैब जाहाले किंवा अस्मानात गेले' असे बखरकाराने लिहिले आहे.

दृढनिश्चयी-भाऊसाहेब दृढनिश्चयी आहेत. आपल्या पध्दतीने संबंधित व्यक्ती व घटनांचा विचार करून ते निर्णय घेतात. एकदा त्यांच्या मनाशी निर्णय झाला की मग त्याला ते चिकटून राहतात. भाऊसाहेबांची उत्तरेकडे जाण्याची निकड त्यानी दमाजी गायकवाडाचे केलेले समाधान, यशवंतराव पवारांचा गौरव आणि इब्राहिम गारद्यास त्यानी दिलेले इमान प्रमाण या सर्व गोष्टींमधून भाऊंचा दृढनिश्चय स्पष्ट दिसतो.

नानासाहेबांकडून कुमक मागणे त्यांना अपमानास्पद वाटते. पण जेव्हा जनकोजी आणि विश्वासराव यांनी तशी पत्रे लिहिल्याचे त्यांना कळते तेव्हा ते रागावतात. त्यांचा विवेक कमी होतो आणि परणिामांचा विचार न करता अबदालीच्या सैन्यावर हल्ला करण्याचा ते निश्चय करतात. 'वेडात मराठी वीर दौडले सात' या कवितेतील प्रतापराव गुजर बहलोल खानाच्या मोठ्या सैन्यावर सहा घोडेस्वारांसह जाऊन आदळतात. तशीच इथे गत झाली आहे. इथे भाऊसाहेब स्वत:च हा धाडसी निर्णय घेतात. मल्हारराव आणि जनकोजी यांचा सल्ला न मानता ते अबदालीच्या सैन्यावर जाऊन धडक देतात. मानवी जीवनात भावभावना आणि विकार प्रबळ ठरतात. हट्टी आणि आग्रही भाऊसाहेब इथे दिसतात.

पानिपतावरील अन्नटंचाई, रसद नाही, पैशाची कुमक नाही, फौज अन्नाने बेजार आणि त्यातच गोविंदपंत आणि बळवंतराव कामी आलेले अशा पेचात सापडलेले भाऊसाहेब अंतर्मुख होतात. त्यातून त्यांच्या मनातील गडद गहिरे रंग दिसतात. विश्वासराव पडल्यावर त्यानी शत्रूला मारण्याची केलेली प्रतिज्ञा आणि गाजविलेला पराक्रम केवळ असामान्य होता, अभिमानास्पद होता. जीवाच्या आकांताने त्यांनी चालविलेली तलवार मराठी मन कधी विसरणान नाही.

शोकनाट्याचा नायक शोभेल असे हे भाऊसाहेबांचे व्यक्तिचित्रण आहे. मानी, मनस्वी, आग्रही, हट्टी स्वभाव आणि त्यामागे असणारी क्रूर नियती यांच्यातील झुंजीचे इथे दर्शन घडते. नियतीच चुका घडवीत जाते. भाऊसाहेब केवळ निमित्तमात्र. 'कर्मनो गहना गती, दुसरे काय?'

असे नियतीप्राधान्य बखरकार सूचित करतो. पानिपतच्या युध्दभूमीवर वीरमरण पत्करून क्षात्रधर्माला उजाळा देणारा हा मराठी सैन्याचा महानायक भाऊसाहेब शोकनाट्याचा नायक शोभतो.

जयाजी शिंदे-भाऊसाहेबांच्या बखरीत जयाप्पा शिंदे, जनकोजी शिंदे व दत्ताजी शिंदे या शिंदे घराण्यातील व्यक्ती आढळून येतात. शिंदे-होळकर यांच्यामधील संघर्षामुळे शिंदे घराण्याचा सर्वनाश झालेला दिसून येतो. जयाप्पा शिंदे शूर आहेत. त्यांच्यामध्ये उत्तरेकडील मोहिम यशस्वी करण्याचे सामर्थ्य आहे. ते प्रामाणिक होते. आपण दिलेले वचन ते प्रामाणिकपणे पाळत. ते मारवाड प्रांतात रामसिंगास म्हणतो,'आता नेकजात जयाजी शिंदे आहेत. त्यास पगडीभाई करून त्यांचे हाताने कार्य करून घ्यावे.' जयाप्पा कारस्थानी नाहीत. बिजेसिंगाबरोबर त्यांनी जे युध्द केले त्यात त्यांनी पराक्रमाची शर्थ केली. मल्हारराव आतुन विरोधी पक्षास सहाय्य करतात. तेव्हा शिंद्यांच्या अस्मितेचा प्रश्न आहे म्हणून या युध्दात यश मिळाल्यावर जयाप्पांना वाटते-'मल्हारराव आजपासून निघालियास ईश्वरे आबरू राखिली. जलमाचे सार्थक झाले.' बिजेसिंगाचा पराभव करून जयाप्पांनी मल्हाररावांच्या पेशवाईतील वर्चस्वाला हादरा दिला.

बिजेसिंगाच्या मारेकऱ्यांनी जयाजींना घायाळ केल्यावर दत्ताजी शिंदे शोक करू लागले तेव्हा जयाप्पा शिंदे दत्ताजींना म्हणतात, ''वैरी युध्दास आला आणि तू रांडेसारिखा रडतोस काय? हे क्षत्रिय धर्मास उचित की काय? आता मजला काही होत नाही. तुम्ही शत्रु पराभव करावा. आपला मृत्यू जवळ आला असतानाही ते दत्ताजींना धीर देतात. त्यांना क्षात्र धर्माची आठवण करून देतात आणि प्राणत्याग करतात. असे हे धीरोदात्त वृत्तीचे जयाजी होते. त्यांची तलवार सपासप चाले. ते शूर होते. पेशवाईचा आधार असलेले जयाजी शिंदे मुत्सद्दी होते आणि मल्हारराव होळकरांचे स्पर्धक होते. वाचकांच्या मनात आदर असलेले हे शिंदे घराण्यातील जयाजी आपल्या तलवारीच्या जोरावर आपले नाव सार्थ करीत होते.

### जनकोजी शिंदे-

स्वाभिमानी-जनकोजी शिंदे हा शिंदे घराण्यातील दुसरी व्यक्ती. जनकोजी हा जयाप्पाचा मुलगा. वडीलांच्या मृत्यूचे शल्य त्यांच्या मनात आहे. मल्हारराव होळकर हे आपल्या वडिलांच्या वधामागे कारस्थानी आहेत. त्यामुळे मल्हाररावाविषयी त्यांच्या मनात तिरस्कार आंहे. मल्हारराव जनकोजीचे शांतवन करण्याचा प्रयत्न करतात तेव्हा जनकोजी मल्हाररावांची भेट घेण्यास नकार देतात. 'आता त्यांची आमची भेट स्वर्गी होईल.' असे बाणेदार उत्तर देतात. यातून त्यांचा स्वाभिमान दिसून येतो.

पराक्रमी-जनकोजी हा जयाप्पा प्रमाणेच शूर होता. त्याने जयनगर व मारवाड प्रांतावरील

मोहीम यशस्वी करून दाखविली होती. त्यांच्या शूरत्वावरून रघुनाथराव स्वत: त्यांना भेटुन नजीबखानाचे पारिपत्य करावे अशी विनंती करतात. जनकोजी नजीबखानाचे पारिपत्य करू शकतो ही मल्हाररावांनाही कल्पना असते म्हणून मल्हारराव त्यांना सातत्याने भेटण्याविषयी व आपल्याबद्दल गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न करत असतात. तसेच शिंदे-होळकरांच्या युतीमुळे पेशव्यांच्यावर वचक असेल असेही मल्हाररावांना वाटत असते. नजीबखान आहे म्हणून पेशव्यांना आपले भय आहे ही गोष्ट जनकोजीलाही पटते.

दत्ताजीच्या वधानंतर जनकोजी केवळ स्वत:च्या बळावर, मोहिमा यशस्वी करतो. बळवंतराव मेहेंदळेंना जनकोजीला सहाय्य करण्यास सांगितले असतानाही ते मदत करीत नाहीत तरी दुराणीशी सामना करून जनकोजी यशस्वी होतात. तेव्हा बळवंतरावांना जनकोजी म्हणतात. ''तुम्हाला आमचा तमाशा पाहणे तरी आमी उदयीक युध्द करितो.'' यातून जनकोजीची अस्मिता व्यक्त होते. भाऊसाहेब त्यावेळी रदबदली करण्याचा प्रयत्न करतात. पण स्वाभिमानसंपन्न जनकोजी 'मुजरा जाहला आता बसावयाचे नाही.' असे म्हणून तेथून तडक निघून जातो. पेशव्यांनाही आधार आणि गरज वाटावी असे हे शूर सरदाराचे व्यक्तिमत्व वाचकाच्या मनात घर करून राहते.

### दत्ताजी शिंदे-

बखरकाराने भाऊसाहेबांच्या बखरीत दत्ताजी शिंदेंची तेजस्वी व्यक्तीरेखा चित्रीत केली आहे. दत्ताजीने अनेक मोहिमा गाजविल्या आहेत. यातून दत्ताजी शिंदेचे शौर्य दिसून येते. भय वा अवसानघात ही गोष्ट दत्ताजीस ठाऊक नाही. मारवाड प्रांतात रामसिंगास मदत करावयास दत्ताजींना जयाजी शिंदे सांगतात त्यावेळी म्हणतो, ''बिजेसिंग युध्दास आला म्हणून नामोहरम व्हावे तरी जालेपणाचे सार्थक काय? नामर्दीची जघन्यता हाईल. युध्द करावे यात यश आपेश शूराचा वाटा याची क्षितिही काय?'' बिजेसिंगाचा तो बीमोड करतो तसेच निजामाबरोबरही युध्द करून त्याला तह करण्यास भाग पाडतो. केवळ डुक्कर खळीस येतो तैसे इरेस पडून मारामारी केली. तेव्हा भाऊसाहेबांनीही हे धन्योद्‌गार काढले, 'दत्ताजी शिंदे यांचे मर्दुमकीची शर्थ आहे! जसे ऐकण्यात आले तसे कर्तव्य करून दाखविले.'' युध्द म्हटले की दत्ताजीस अपूर्व आवेश चढतो. यातून दत्ताजी शिंदेचे शूरत्व व निर्भिड वृत्ती दिसून येते. एकदा जे ठरवतील ते कार्य पूर्ण करतील मग प्राण गेला तरी चालेल. दिलेल्या शब्दाला पाळणारे दत्ताजी शिंदे एकनिर्ष्ठी, एकवचनी दिसून येतात. नजीबखान दत्ताजीस दगा देतो आणि त्यामुळे दत्ताजीस अनेक संकटांना तोंड द्यावे लागते. पानिपतच्या युध्दात त्याने अबदालीशी घेतलेली झुंज. त्याने त्या प्रसंगी काढलेले वीरश्रीयुक्त उद्‌गार, ''आम्हा क्षत्रियां स्वधर्म हाच की रणात विनमुख होऊ नये--- अशात कोणी अभाग्य असेल तो विनमुख होईल. रण सोडून निघाल्यास दोन्हीसही मुकावे. इकडे नर्कसाधन,

इकडे आपेश मरणाहून वोखटे, यात मरताच उत्तम.'' कुतुबशहाबरोबरच्या युध्दात त्याने काढलेले उद्‌गार 'इनशाअलाताला ! बचेंगे तो और भी लढेंगे' अविस्मरणीय आहेत. त्याने केलेल्या पराक्रमाची आठवण मराठी माणसाच्या मनात घर करून राहते. दत्ताजीने पत्करलेल्या वीर मरणाची आठवण मराठी माणूस कधीही विसरणार नाही. दत्ताजी एक शूर सरदार होते. त्याचा शिरच्छेद कुतुबशहाने केला. तेव्हा दमाजी गायकवाडास कुतुबशहा जिवंत सापडले त्यांनी भाऊसाहेबांच्या समोर कुतुबशहास उभे केले आणि विचारले की, ''दत्ताजी शिंदे यांचा शिरच्छेद तुम्हीच केला की काय? तेव्हा कुतुबशहा समजून गेला आता आपल्याला प्राणानिशी सोडत नाहीत. तेव्हा मूर्खपणे बोलला, ''आम्ही आपला स्वधर्म केला. आमचे कुराणात निश्चय आहे की शत्रूचा शिरच्छेद करून भाल्यास सिर टोचून मग शाहदाने वाजवावी. त्याप्रमाणे वर्तणूक केली. तेव्हा भाऊसाहेबांची तळपायाची आग मस्तकास गेली. ''अंग रोमांच जाहले. क्रोधाची सीमा जाहाली. क्रोध समुद्र ढवळला आणि आज्ञा करिते जाहाले की, ढालेपाशी नेऊन याचा शिरच्छेद करावा.'' कारण दत्ताजी शिंदेंच्या बद्दल भाऊसाहेबांना आत्मीयता होती. त्यांचा एक शूर सरदार मारला गेला होता.

## नजीबखान रोहिला -

नजीबखान हा अतिशय कुटील कारस्थानी आणि धूर्त आहे. तो मराठ्यांचा पक्का शत्रू आहे. तो वरकरणी मराठ्यांना सहाय्य करतो असे सांगून आपल्या मित्रांच्या संगनमताने मराठ्यांचा काटा काढतो. शिंदे हे आपल्याला केव्हा ना केव्हा भारी आहेत तेव्हा मल्हाररावांशी स्नेह वाढवून दत्ताजी शिंदेंचा विश्वासघात करतो. नजीबखान हा कपटी, कारस्थानी व विश्वासघातकी आहे हे यावरून दिसून येते. पानिपतच्या युध्दभूमीवर भाऊसाहेबांना खेचून आणून त्यांच्या पदरी अपयश टाकणारा हा पाताळयंत्री गृहस्थ आहे. मराठा सरदारांशी मतलबी मैत्री करून आलेल्या प्रसंगातून निभावून जाणारा हा हिकमती व स्वार्थी सरदार आहे. बखरकाराने याच्यासाठी 'मात्रागमनी' असा शब्द वापरला आहे. इतका हा कृतघ्न व कुटील आहे. तत्त्व कशाशी खातात याचा याला पत्ता नाही. उत्तरेत मराठ्यांना पायबंद घालण्यास पुढे सरसावलेला हा पक्षपाती सरदार उत्तरेतील मराठ्यांच्या शत्रूंना एकत्र आणण्यात यशस्वी होतो. कंधारच्या अबदालीस पाचारण करून त्याच्या सहाय्याने मराठ्यांचा काटा काढण्याचे कुटील कारस्थान रचणारा हा नजीबखान स्वार्थी, मुत्सद्दी, पाताळयंत्री, आपमतलबी, शब्द फिरवणारा आणि क्षुद्र मनोवृत्तीचा आहे. मराठ्यांच्या विरोधात कट करण्यात केंद्रस्थानी असणारा हा नजीबखान होळकर आणि शिंदे यांच्या उगारलेल्या तलवारीखालून निसटतो आणि पुढे जाऊन मराठी सेनेलाच तो गिळतो हा दैवदुर्विलास होय. थोडक्यात पानिपत कथेत हा खलनायक वाटतो.

## इतर व्यक्तिचित्रणे -

भाऊसाहेबांच्या बखरीत इतर अनेक व्यक्तिचित्रणे आली आहेत. त्यामध्ये सुरजमल जाटाची मुत्सद्देगिरी, शौर्य, औदार्य, अबदालीची मुत्सद्देगिरी व त्यांचे क्रौर्य, बळवंतरावाचा कारस्थानी स्वभाव, कुटीलता व त्याला भोगावे लागणारे प्रायश्चित्त, रघुनाथरावांचा संधिसाधूपणा, विश्वासरावांचे शौर्य, त्याचप्रमाणे लढता लढता रणात पडलेल्या पित्याचे शिर घोड्यावरून खाली येवून मांडीवर घेणारा शेट्याजी खराड्यांचा पुत्र आणि रणात पडलेल्या पित्याला टाकून पळ काढणारा गोविंदपंत बुंदेल्यांचा पुत्र. जखमी बळवंतराव मेहेंदळ्यावर आपल्या देहाचे पांघरूण घालून सती पडावे तसा पडणारा खंडेराव निंबाळकर आणि पळणाऱ्या लोकांना परत फिरवतो असे सांगून एकाकी भाऊसाहेबांना सोडून तिकडेच पळ काढणारा सोनाजी भापकर, शेट्याजी खराड्याच्या विनवणीमुळे अंत:करणात कारूण्याचा पाझर फुटलेला पठाण आणि घायाळ जनकोजीस 'पाणी-पाणी' म्हणत असतानाही पाणी ही न देणारे त्यांचे स्वकीय पाठीराखे. तसेच अमिषाला बळी न पडता दिलेले इमान,वचन पाळणारा, इभ्रामखान गाडदी अशी अनेक व्यक्तिचित्रणे बखरकाराने जिवंत केली आहेत.

## स्त्रियांची व्यक्तिचित्रणे-

भाऊसाहेबांच्या बखरीत अनेक स्त्रियांची व्यक्तिचित्रणे बखरकाराने रेखाटलेली दिसतात. अनेक स्त्रिया तीर्थ पर्यटनासाठी उत्तर हिंदुस्तानाच्या मोहिमेवर आल्या होत्या. त्यामध्ये मल्हाररावांची निर्भत्सना करणारी व युध्दावर जावून गिलच्यांचे पारिपत्य करा म्हणणारी गौतमाबाई, नजीबखानाशी स्नेह वाढवून राजकारणाच्या उलाढाली करणारी मलकाजमानी, उत्तरेकडील मोहिमेवर दत्ताजी शिंदे निघतात तेव्हा पाटील आजच आपणास अंतरले असे म्हणणारी तसेच दत्ताजीच्या वधानंतर शोक करणाऱ्या जनकोजीस "बाबा तू रडतोस काय? जयाजी शिंदे यांचे पोटी चौघी लेकी जाहाल्या तसीच तू एक झाली असती तर आणखी एक जावई येता", असे म्हणणारी काशीबाई, बळवंतरावांबरोबर सती जाणारी बळवंतरावांची पत्नी, विश्वासरावांच्या मृत्यूनंतर 'ईश्वरे आम्हास एवढे निर्वाण का दाखविले?' म्हणून शोक करणारी पार्वतीबाई अशा अनेक स्त्रियांची व्यक्तिचित्रणे बखरकाराने जिवंत केली आहेत.

# भाषाशैली

भाऊसाहेबांच्या बखरीत पेशवेकालीन मराठी भाषाशैलीचा उत्कृष्ट नमूना पहावयास मिळतो. पेशवेकालीन शब्दविशेष आणि वाक्प्रचार यांनी ती संपन्न असल्याने त्यातून ऐतिहासिक वातावरणाची निर्मिती सहजसुंदर झाली आहे. या बखरीत महाराष्ट्र, राजस्थान, मारवाड आणि उत्तर हिंदुस्तान येथे घडलेल्या अनेक ऐतिहासिक प्रसंगांचे आणि व्यक्तींचे वर्णन आले आहे.

त्यामुळे यातील मराठी भाषेत हिंदी, मारवाडी, उर्दु, फारसी या अनेक भाषांतील शब्दांची आणि वाक्प्रचारांची रेलचेल दिसून येते. त्यामुळे ही भाषा जिवंत झाली आहे. बखरकार बहुश्रुत आणि पंडित असल्याने संस्कृत भाषेतील अवतरणांचाही इथे भरपूर उपयोग झालेला पहावयास मिळतो.

१.लयबध्दता-भाऊसाहेबांच्या बखरीत मूळ आशयाची यथार्थ अभिव्यक्ती करताना शब्दांची साधी, सुटसुटीत आणि लयबध्द रचना जागोजाग आढळते.

उदा.-'लोभीयाचे ध्यानात धन बसते तैसे जाहाले.'' हिंदुस्थानात एक नजीबखान मात्र 'खणू' राहिला आहे. त्याचे पारिपत्य केलिया पेशवे अटकेपासून जासुदाचे हाती पैसा आणवितील. ....यास्तव येवढे 'खणू' रक्षून जे करणे ते करावे.' 'हल्ला करून किल्ला घेतला.', 'खणखणीत तलवारी खणाणल्या.' 'भडभुंजे लाह्या भाजतात तशी गत केली.' 'मुरगी मारी तो बचडे दाणादाण होतात तसे सैन्य पळाले.' 'त्यांची आमची पुन्हा भेट आता स्वर्गी.' 'अजुनही तुम्हास करावयाचे उचित.' अशी अनुप्रासात्मक वाक्यांची पखरण बखरभर झाली आहे. त्यामुळे वाक्यावाक्यातून नादसौंदर्य प्रत्ययाला येते.

२.सुगमता-या बखरीतील भाषा अगदी सोपी व सुगम आहे. मराठी भाषेचे सामान्य ज्ञान असणाऱ्या वाचकालाही ही भाषा सुबोध वाटते. या बखरीतील भाषेचे हे एक महत्वाचे वैशिष्ट्य आहे. उदा.-पाण्याआधी वळण बांधिता उत्तम---'मी तुमचा धर्मपुत्र आहे. माझा बच्याव करावा. शरण आलियास मरण चिंतू नये हे समर्थास उचित होय.'- 'सिंदे तो कुच करून चालिले. तुम्ही वडील आहां. आम्हास मनसोबा कोणता देता? - ऐसी आग जाहाली. नंतर आगीचा मार राहून तरवारीची खणाखणी जाहाली. त्यात ते आधीच रजपूत. त्यात मारवाडी हाडे. त्यांची मरदुमी नवल नाही. परंतु मराठियांनी फारच शर्त केली. एकच गर्दी जाहाली. आसे युध्द गलिमात कोणी केले नाही.-शहरचा चिंधीचोळा करोन किल्ल्यास येऊन लागले. दो-चहो दिवसात किलाहि घेतला. पातशहा आलमशहा होता तो कैद केला.''- अशा पध्दतीने संवाद असो, अगर स्थल वर्णन असो, प्रसंग वर्णन असो अगर निवेदन असो, बखरीची भाषा वाचकाला सहज कळत जाते. त्यामुळे त्यातील आशय परिणामकारक रीतीने वाचकाच्या मनाला भिडतो.

३.काव्यात्मकता-बखरकार व्यासंगी आणि बहुश्रुत असल्याने अनेक म्हणी, वाक्प्रचार, सुभाषिते, सुविचार आणि काव्यातील अवतरणे बखरीमध्ये त्याने ठायी ठायी पेरली आहेत. दत्ताजी शिंदे गंगा नदीच्या तीरावरील गणमुक्तेश्वरी येथे आले आणि त्या तीर्थक्षेत्रावर पूजाअर्चा करून त्यानी दानधर्म केला. यावेळी बखरकाराने एक दोहा योजिला आहे.

'जलकी शोभा कमल है, दलकी शोभा पील।

धनकी शोभा धरम है, कुलकी शोभा शील ।।'

या काव्यपंक्ती येथे देण्यात बखरकाराने औचित्य प्रकट केले आहे. काव्याच्या अवतरणातून काव्यात्मता व्यक्त होते. दत्ताजी शिंदे अन्य मराठी सरदारांना बोलावून अबदुल अलीवर हल्ला करण्याचे आवाहन करतो. त्यावेळी तो दोहा सांगतो-

'मारू तो मर जाऊंगा, हटूं तो जनोंकी लाज ।

ये खुदा परवर दिगार, दोनों कठीज काज ।।'

वीराला दोनही गोष्टी अवघड. हल्ला करावा तर मृत्यू येतो. मागे फिरावे तर लोक नावे ठेवतात. दत्ताजीच्या मुखातील ह्या ओळी वीराचे मनोगत व्यक्त करतात.

''भागीरथीबाई व कासीबाई यास राहुटीदेखील नाही. तेथे गौतमाबाई आली. ते समयी उभयता बायांच्या भेटी जाहल्या. तेव्हा त्यांच्या भाषणाचा, शोकाचा येकच कोल्हाळ जाहाला. तीन दिवस दम खादला होता तितक्याच उभाडा जाहला. तो आकांत पत्री काय लिहावा?'' या वर्णनातील कारूण्य काव्यात्म झाले आहे.

४.विचार सौंदर्य-बखरकाराने आपल्या निवेदनकौशल्याने सुभाषितांचा आणि सुविचारांचा वापर करून बखरीमध्ये विचारसौंदर्य विकसित केले आहे.

-भाग्य अभाग्य कालपरत्वे येत जाते निश्चय मात्र चळू नये.

-स्वकीर्ती करून मरावे.

-आग्न लहान म्हणो नये, तसेच शत्रू अल्प म्हणो नये.

-आपली कास बळे घालावी, कोणास आस न धरावी.

-आयत्या पीठावर रेघा कोणीही ओढेल.

-नकटे असावे पण धाकटे असू नये.

-शरण येईल त्यास मरण चिंतू नये.

-आबरू जाते आणि वाचतो कोण?

या वाक्यांच्यामधून त्या व्यक्तीच्या मनातील विचारसौंदर्य व्यक्त होतात.

५.म्हणी आणि वाक्प्रचारांचा वापर-भाऊसाहेबांची बखर ही लोकजीवनातील म्हणी आणि वाक्प्रचारांच्या समृध्द वापराने मंडित झालेली आहे.

-जात्यातले रडती आणि सुपातले हसती.

-दे माय धरणी ठाय.

-एकीकडे आड व एकीकडे विहीर.

-साठी बुध्दी नाठी.

-कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ.

-न भूतो न भविष्यति.

-येक आणी चुकी तो बारा बरसकी हयात.

-विनाशकाली विपरित बुध्दी.

याचबरोबर रणी पडणे, व्यंग गोष्टी सांगणे, आकाशाची दोरी तुटणे, रानभरी होणे, वाटेस लावणे, निर्वाण समय भासणे, ससेहोलपट करणे, तळव्याची आग मस्तकास जाणे, मसलत करणे, इरेस घालणे, मोगलाई मसलत करणे, मनसबा करणे, मर्यादा न धरणे, गनिमी कावा करणे असे कितीतरी वाक्प्रचार लेखनाच्या ओघात बखरकार वापरतो. त्यामुळे भाषा अधिक डौलदार झाली आहे. या म्हणी-वाक्प्रचारांच्या सढळ वापरामुळे बखरीची लेखनशैली सुचारू झाली आहे. बखरीमध्ये त्यामुळे कलात्मकता आली आहे.

६.शब्दसौंदर्य-बखरीमध्ये अनेक भाषेतील शब्दांचा वापर वाचकास एक वेगळाच आनंद देतो. हिंदू धर्म, ईश्वर, साहित्य, वियोग, विलाप, शोक, उत्तरक्रिया, पूर्वाचरण, वर्तमान, स्वकर्म, सूर्योदय, पुत्र असे अनेकानेक तत्सम शब्द बखरीमध्ये आले आहेत.

आनभव, कोस, दक्षण, काज, जलम, बरसात, नारळ, ससा, आपेश, आवस्ता, तोंड, सिरछेद, भुई, गत, विच्यार, बुधी असे कितीतरी तद्भव शब्द बखरीत पेरले गेले आहेत.

पेशवेकालीन मराठीवर फार्सीचे प्रभुत्व होते. त्यादृष्टीने फार्सी शब्दांचा प्रभाव बराच आहे. फौज, तमाम, वकील, हिंमत, साफ, अर्ज, यार, दौलत, मुकाम, लष्कर, मर्द, रूबरू इ. फार्सी शब्दांचा बराच भरणा आहे.

अरबी फार्सी शब्दांची रूपेही बरीच आली आहेत. तोफ, गलीम, सुतरनाला, मुरदा, निशाण, नजीक, चोपदार, पागनीस, अंबारी, सहादाने, जाबसाल, सुभा, खतल, कुरनिस, उमर, शाबुत, मइदान, फते अशा शब्दांचा समावेश भाषेत बराच आहे.

मूठमाती, खांडवा, हिरहिऱ्या, पोळजत्रा, उठावणी, हातघाई, घायाळ, मातबर, माघारा, सूर्यबिंब इ. शब्दांतील मराठमोळेपणा लक्षणीय आहे. त्यावेळच्या लोकभाषेचा आणि बखरीचा जिव्हाळ्याचा संबंध होता हे यावरून लक्षात येते.

## संवाद लेखन

भाऊसाहेबांच्या बखरीत संवादाच्या माध्यमातून बखरकाराने स्वभावचित्रण व प्रसंगनिर्मिती

साधली आहे. त्यामुळे त्यात येणारी स्वगते, भाषणे, संभाषणे, आव्हाने आणि आवाहने यामुळे बखरकाराचे निवेदन अधिक जिवंत होते. बखरकाराने मराठी, हिंदी, उर्दू, फार्सी, संस्कृत अशा विविध भाषा बोलणाऱ्या व्यक्ती संवादातून समर्थपणे उभ्या केल्या आहेत. त्यातील काही उदाहरणे-

"यार हो दखणी बंदर नाचता है क्या! देखो-दिल्लीचा पादशहा निशा अकताला ! हुकमत परवर दिगार ! बाबका बीज हो तर कर दिखलाऊ. बंदरका बिकार दिकलाऊ !"-किलीजखान

"देईन मान व देईन प्राण या अर्थी एक दोहरा आहे तो सांगतो-

मारू तो मर जाऊंगा, हटू तो जनोंकी लाज !

ये खुदा, परवर दिगार दोनो कठीण काज"-दत्ताजी

"डोखरे, रोता है क्यो ! तुम्हारा जान खाली आम्हार जान उपर है। फिकीर न करावी." - रूपराम कटारी

"तुम्ही लौकिक करून गेला तरी मीहि वाचणार नाही. तुमची सांगातीण होईन."बळवंतरावांची पत्नी

"वैरी युध्दास आला आणि तू रांडेसारखा रडतोस? हे क्षात्र धर्मास उचित की काय? आता मजला काही होत नाही. तुम्ही शत्रू पराभव करावा."-जयाजी शिंदे.

"राव. तुम्ही आम्हावर का रूसला? आमचे हातचा विडा घेतला नाही. इश्वरे आम्हास एवढे निर्वाण का दाखविले."-बळवंतरावाची पत्नी.

"महाराजांची हांडी उतरावी व आपली हांडी चढवावी."-चेतराम.

"तुम्ही---जातीचे हटले, हाडे राजपूत. हिंमत मर्दा मदत खुदा. मार्ता मार्ता मरावे."-चेतराम.

"बहादरकी शरम पार पाडावे."-रूपराम कटारी.

"कुंभेरीची माती यमुनेत टाकीन तरीच जन्मास आलेचे सार्थक."-मल्हारराव होळकर.

"आमचे अस्तनीतच आग्र आहे आणि जाट हस्तगत कसा होतो?"-मल्हारराव होळकर.

"सभाग्य साधून जाय निधी आणि अभाग्य मागे मृतिका शोधी. तैसी आमची गत जाहाली."-दत्ताजी शिंदे.

"याद हो ! निदान समय येऊन पडला आहे. आमचे आबरूवर आले आहे. आमचे मनात आहे की, निदान समई हत्तीस आड घालून लक्षावे."-दत्ताजी शिंदे.

"बयाजी बाबा, तुम्ही हमेशा लढाया करिता, नव्याने झुंज करीत नाही, केलियाचे नवल नाही. न केलियाचे मात्र नवल ! आता बोलावयास फुरसत नाही. त्वरा करावी."-दत्ताजी

शिंदे.

''पटेल, हमारे साथ तुम और लढेंगे?''-कुतबशहा.

''बचेंगे तो और भी लढेंगे।''-दत्ताजी शिंदे.

''आम्ही दक्षण सोडून तुमचे बलावर आलो नाही.''-भाऊसाहेब.

''मजला प्राण-दान देणे, क्रोड रूपये देतो.''-गोविंदपंत

''ईश्वरे यश दिले तरि उत्तम. नाही तरी पुन: तुमची आमची भेट स्वर्गी होईल.''-जनकोजी शिंदे.

''भाऊसाहेब, आम्हास रणात मारावे परंतु अन्नाविणे मारू नये.''-सरदार.

''भाऊसाहेब ! तुम्ही वाचला तरी अवघ्यांचा सूड घ्याल. नाही तरी तुमचे मागे आवघ्याच गोष्टी आटपल्या.''-तुकोजी शिंदे.

बखरकाराने साधलेल्या या संवादातून त्या व्यक्तींच्या भावना, स्वभाव व विचार व्यक्त होताना दिसतात. त्यामुळे त्या व्यक्ती व प्रसंग उठावदार दिसतात.

उर्दू भाषेतील त्या व्यक्तींचे संवाद, ते प्रसंग जिवंत करताना दिसतात. मराठ्यांच्या संवादातील पेशवेकालीन मराठी बोली इथे ताकदीने प्रकट झाली आहे. येथील संवाद सहज आणि सुंदर आहेत. त्यातून बखरकाराचे बहुश्रुत व्यक्तिमत्व स्पष्ट दिसते. या बखरीत नाट्यपूर्ण संवादलेखनाचा आदर्श आहे. दत्ताजी -कुतुबशहा, राजाराम चोपदार यांच्या संवादाप्रमाणेच जनकोजी-भागीरथीबाई, भाऊसाहेब-मल्हारराव होळकर, भाऊसाहेब-बळवंतराव यांच्या संवादामधून नाट्यात्मकता अवतीर्ण झाली आहे. मलकाजमानी आणि नजिबखान यांच्या संवादात स्वाभाविकता आहे.

## रसपरिपोष

भाऊसाहेबांच्या बखरीत बखरकाराने विविध रसांचा वापर करून बखरीतील व्यक्तिरेखा आणि प्रसंग जिवंत केले आहेत. वाचकांच्या समोर इतिहास उभा करण्याचे सामर्थ्य या रसपरिपोषामुळेच प्राप्त झाले आहे. वीर वृत्तीने भारलेल्या व्यक्ती, त्यांचे पराक्रम, युध्दाची धुमश्चक्री-आव्हाने, युध्दातून माघार, सैनिकांची पळापळ, भयभीत छावण्या, अद्‌भुत घटना इ. वर्णने बखरकाराने रेखाटून वीर, करूणा, रौद्र, बीभत्स ह्या रसांचा परिपोष साधला आहे.

वीररस-भाऊसाहेबांच्या बखरीत अनेक व्यक्ती वीर वृत्तीने भारलेल्या आहेत. 'बचेंगे तो और भी लढेंगे' असे म्हणणारा दत्ताजी शिंदे, प्राणाची बाजी लावून लढणारे मल्हारराव होळकर, जनकोजी शिंदे, इभ्रामखान गारदी,'हाणा मारा' म्हणून शत्रूवर तुटुन पडणारे भाऊसाहेब यांच्या

झपाटलेल्या पराक्रमाचे वर्णन बखरकाराने केले आहे. उदा.

"जैसे पूर्वी रामायणी राक्षस व वानर लढले किंवा भारती कौरव-पांडव लढले याप्रमाणे लढाई जाहाली. तोफांचा व बाणांचा मारा जाहाला, पर्जन्यप्राय कोसळू लागले, मुद्यांवर मुर्दे पडू लागले. मुडद्यांनी खंदक भरला." "तुम्ही जेथे उडी टाकून गाडून उभे राहाल तेथे आम्ही कत्तल होऊ, परंतु रण सोडणार नाही. आम्ही मराठे झाडास बांधले तर झाड घेवून जावे हा आमचा स्वभाव." "कुंभेरीची माती यमुनेत टाकीन तरीच जन्मास आल्याचे सार्थक !" अशी अनेक उदाहरणे वीर रसाला पोषक आहेत.

करूणरस-भाऊसाहेबांच्या बखरीत युध्दात अपयश आल्याने अनेक दु:खद संकटांना मराठी सरदारांना सामोरे जावे लागले.

उदा.-उत्तरेकडे भाऊसाहेब निघाले असता नानासाहेबांच्या भावना-"आम्हास दशरथाची गत जाहाली. तुमच्या वियोगाने आम्हास काहीच सुचणार नाही."

बळवंतराव मेहेंदळे लढाईवर जात असताना "ईश्वरे यश दिले तरि उत्तम नाही तर पुन्हा तुमची आमची भेट स्वर्गी होईल." बळवंतराव मेहेंदळ्यांची पत्नी सती जाण्याचा प्रसंग. तिने केलेला शोक. "ईश्वराने एवढे निर्वाण का दाखविले." आपली आई सती जाणार असे समजताच तिच्या मुलाने केलेला शोक-"आम्ही आनपाणी कोणास मागावे? कोणावर रूसावे?" त्यावर तिने-"तुम्ही आनपाणी ईश्वरावर मागावे आणि ईश्वरावर रूसावे." असे दिलेले उत्तर.

पानिपतच्या युध्दामध्ये निशाण गुंडाळून पळणाऱ्या सैनिकांचे वर्णन मन हेलावून टाकते. मुडद्यांनी खंदक भरला या वर्णनातून डोळ्यातून अश्रु उभे राहतात. दिल्लीतील बायकासुध्दा ज्यावेळी लष्कराला मारू लागतात, लुटु लागतात त्यावेळी सैन्याची भयभीत अवस्था. दोन लाख रूपये देऊन, दत्ताजी शिंदे यांचे शिर घेवून, प्रेताच्या खचात पडलेले धड शोधून काढून त्यानंतर त्यास अग्नी दिला तर चार लाख रूपये देवून ज्यावेळी विश्वासरावांचा व आणखी तीन मुडद्यांचा ताबा घेतला. रात्रीचे लढाईत अंताजी माणकेश्वर व बाजीहरी ठार झाले त्यांचे मुडदे देखील कोणी काढले नाहीत. पळापळ चालू असताना त्यातून स्त्रियाही सुटल्या नाहीत. त्यानाही वाट मिळेल तिकडे पळावे लागले. भाऊसाहेबांच्या पत्नीला पार्वतीबाईंना बुणग्याबरोबर पळून जावे लागले. "मी भाऊसाहेबांची स्त्री आहे मजला घोड्यावर घ्यावे." अशी विनवणी करावी लागली. यापेक्षा दुर्भाग्य ते कोणते? नाना फडणवीस यांची मातोश्री गिलच्यांच्या हाती सापडली तर त्यांच्या पत्नीला घोड्यावरून उतरून अंगावरील वस्त्रे काढून फाटके वस्त्र नेसून अंगास माती लावून दिल्लीच्या रोखाने अनवाणी जावे लागले. गिलचे शाळवाची कणसं कापल्यासारखी

डोचकी कापीत. काही मुडद्यांना सिर होते तर काहींना धडेच होती. ज्या ध्वजाच्या अस्तित्वासाठी अनेक मराठ्यांनी शिवकालापासून रक्त सांडले ते निशाण गुंडाळून मराठ्यांना जीव वाचवण्यासाठी पळावे लागले. जनकोजी शिंदे घायाळ झाल्यावर घोड्यावर बसवून दोन्ही बाजूस धरून फौज तडक पळू लागली. घायाळ जनकोजी यानी पाणी पाणी म्हटल्यास पाणी घ्यावयास दम निघेना.

अशी ही करूण रसात न्हालेली वर्णने वाचकांच्या मनाला पाझर फोडतात. बखरकार त्या प्रसंगातील कारूण्य समर्थपणे आपल्या लेखणीतून व्यक्त करतो.

बीभत्स रस-भाऊसाहेबांच्या बखरीत बीभत्स रसाची काही अपवादात्मक वर्णने आढळून येतात. 'रक्ताच्या नद्या वाहिल्या.' 'रक्ताचा चिखल झाला.' 'डोचकी कापली.' 'हातपाय तुटले.' अशी काही उदाहरणे आहेत.

अद्‌भूत रस-भाऊसाहेबांच्या बखरीत काही युध्द वर्णने करताना बखरकाराने 'महाभारत' व 'रामायण' यातील युध्दांचे आदर्श ठेवून युध्द वर्णनात अद्‌भूतरम्यता आणली आहे. पानिपतच्या युध्दात गाई दिवसा रडू लागल्या. रानातील प्राणी शोक करू लागले. नदीने वाट दिली. तसेच भाऊसाहेबांनी जी छताची चांदी काढली ते समयी भूमिकंप जाहला.--- उल्कापात जाहला अशी वर्णने आढळतात.

हास्यरस-भाऊसाहेबांच्या बखरीत अपवादात्मक प्रसंगवर्णनातून विनोद साधला आहे.

गौतमाबाईने केलेला मल्हाररावांचा उपहास व किलीजखानने 'यार हो ! दखणी बंदर नाचता है क्या, देखे' असे म्हणून केलेली फजिती ही त्याची उदाहरणे आहेत.

रौद्ररस-पानिपतच्या युध्दात अनेक वीरांच्या मृत्यूचे वर्णन करताना अनेक वेळा रौद्र वर्णने आली आहेत. उदा.-कुतुबशहा याने कमरेचा सुरा काढोन लाथेने ढकलून पालथा पाडून दत्ताजी शिंदे यांचा सिरच्छेद केला व सीर भाल्यास टोचून शाहदाने वाजवीत जाते जाहले. दोन लाख रूपये देऊन त्यांचे सिर विकत घेतले पण धड कुठे? ते शोधून काढावे लागले. गिलच्यांनी शाळवांची कणसं कापावीत तशी डोचकी कापली. नाके कापली अशी वर्णने आढळतात.

वत्सल रस-बखरकाराने अनेक नात्यातील प्रेमळ धागा पकडून वात्सल्य रसाची निर्मिती केली आहे. उदा. भाऊसाहेबांचा निरोप घेताना नानासाहेब व गोपिकाबाई आम्हास दशरथाची गत जाहली. तुमच्या वियोगाने आम्हास काही सुचणार नाही. बळवंतरावाच्या पत्नीने बळवंतरावांच्या मृत्यूसमयी राव ! तुम्ही आम्हावर का रूसला? इ. वात्सल्यरूप वर्णने आढळतात.

अशा तऱ्हेने बखरकाराने तो तो प्रसंग त्या त्या रसात आपल्या लेखणीच्या कौशल्याने उभा केला आहे. वीररसातील युध्दवर्णने, करूणरसातील शोकवर्णने विशेषेकरून ठसठशीत झाली

आहेत. तो प्रसंग वाचकाच्या डोळ्यासमोर उभा करण्याचे सामर्थ्य बखरकाराचे लेखणीत निश्चितपणे आहे. त्या दृष्टीने भाऊसाहेबांची बखर सरस आणि रसाळ उतरली आहे.

थोडक्यात विस्तृत पण बांधेसुद व प्रभावी कथानक, वैशिष्ट्यपूर्ण व बखरीला उठावदारपणा प्राप्त करून देणारी अप्रतिम व्यक्तिचित्रे, हिंदी-उर्दू-फारसी शब्दांचा प्रभाव असलेली मराठमोळी परिणामकारक भाषाशैली, व्यक्तिचित्रे ठसठशीत करणारे संपन्न संवादलेखन, सबंध बखर भाववाही करणारा धष्टपुष्ट रसपरिपोष, त्यातून व्यक्त होणारे बखरकाराचे बहुश्रुत व व्युत्पन्न व्यक्तिमत्व, रेखीव आणि सूक्ष्म दृश्यात्मकता, लक्षणीय ध्वन्यात्मकता, अंगावर रोमांच उभे करणारे वीररस वर्णन आणि सहृदय वाचकाच्या हृदयाला पाझर फोडणारे करूणरस वर्णन या विविध वाङ्मयगुणांनी भाऊसाहेबांची बखर नटलेली आहे. म्हणूनच आजही मराठी वाचकांवर ती प्रभाव गाजवीत राहिली आहे. मराठी बखर वाङ्मयप्रकारातील एक अनमोल रत्न असे या बखरीचे मराठी सारस्वतात मोल आहे.

# संदर्भ


| | |
|---|---|
| १.भाऊसाहेबांची बखर | संपा.रघुनाथ विनायक हेरवाडकर<br>व्हीनस प्रकाशन पुणे<br>पहिली आवृत्ती जाने १९९०<br>पृ.क्र.१ |
| २.भाऊसाहेबांची बखर | संपा. डॉ.यू.म.पठाण<br>कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे<br>पहिली आवृत्ती १ मे १९७५<br>पृ.क्र.२ |
| ३.तत्रैव | पृ.क्र.३ |
| ४.तत्रैव | पृ.क्र.३ |
| ५.उपनि १ | पृ.क्र.२२ |
| ६.तत्रैव | पृ.क्र.५० |
| ७.तत्रैव | पृ.क्र.५८ |
| ८.उपनि १ | पृ.क्र.२० |
| ९.तत्रैव | पृ.क्र.५५ |
| १०.तत्रैव | पृ.क्र.५५ |
| ११.उपनि १ | पृ.क्र.५५ |
| १२.तत्रैव | पृ.क्र.६९ |
| १३.तत्रैव | पृ.क्र.१७ |
| १४.तत्रैव | पृ.क्र.७० |
| १५.भाऊसाहेबांची बखर | संपा.शं.ना.जोशी<br>~~सभासद~~ भारत इतिहास मंडळ, पुणे<br>सातवी आवृत्ती १९५९ |

| | |
|---|---|
| | पृ.क्र.८ |
| १६.उपनि २ | पृ.क्र.७८ |
| १७.उपनि २ | पृ.क्र.१०६ |
| १८.उपनि २ | पृ.क्र.८१ |
| १९.तत्रैव | पृ.क्र.८३ |
| २०.तत्रैव | पृ.क्र.८३ |
| २१.उपनि १५ | पृ.क्र.११४ |
| २२.तत्रैव | पृ.क्र.११४ |
| २३.उपनि २ | पृ.क्र.९२ |
| २४.तत्रैव | पृ.क्र.९२ |
| २५.तत्रैव | पृ.क्र.९९ |